राष्ट्रदेवोभव ।

महाराष्ट्र-राष्ट्रभाषा-प्रचार-समितीनें
पुरस्कृत केलेला

हिंदी

कहावत कोष
और
सूक्तियाँ

— शंकर गंगाधर जोशी,
संगमनेर

महाराष्ट्र-राष्ट्रभाषा-प्रचार-समितीनें पुरस्कृत केलेला

कहावत कोष

और

सूक्तियाँ

सुमारें २५०० म्हणींचा मराठी अर्थ
हिंदी अर्थ व मराठी म्हणीसह

संग्राहक:–
शंकर गंगाधर जोशी,
संगमनेर, जि. नगर

मूल्य—साधी प्रत रु. १॥४ सजिल्द रु. १॥८

मुद्रक– **दत्तात्रय शंकर जोशी,**
नवभारत प्रेस, अहमदनगर
भूमिका, पानें १ ते ६
विष्णू गंगाधर केतकर,
लोकसंग्रह प्रेस, सदाशिव पेठ, पुणें.
पानें १ ते १७६

प्रकाशक
शंकर गंगाधर जोशी,
C/o नवभारत मुद्रण-मंदिर, अहमदनगर

भूमिका—

Wisdom of many and wit of one (डॉ. रसेल):--
"बहुतांचें शहाणपण व एकाचें ज्ञान" या शद्बांत कहावत शद्बाचा अर्थ उत्तम प्रकारें दिग्दर्शीत केला आहे. A wise saying या J. C. Rollo च्या संक्षिप्त स्पष्टार्थापेक्षांहि हिन्दींत "गागरमें सागर" ह्या म्हणीनें कहावत या शद्बाचा अर्थ पूर्णपणें बोधिला नाहीं असें कोण म्हणेल? कहावत–म्हण हिला हिन्दींत लोकोक्ति किंवा सूक्ति असेंहि म्हणतात

सुभाषितं तु साहित्ये सुधैव विबुधैर्मतम् ।

A proverb is an ornament to Language.

कोणत्याहि भाषेच्या साहित्याला म्हणी, वाक्प्रचार किंवा वाक्संप्रदाय यांच्या संपत्तीवर आणि उपमालंकार यांच्या भूषणांवर वैभव संपन्नता प्राप्त होत असते. ज्या भाषेंत कहावतींचा व वाक्संप्रदायांचा भरणा ज्यास्त, ती भाषा प्रौढ, सुलभ, अर्थोत्पादक व सुगम अशी मानली जाते. आपल्या राष्ट्र-भाषेचें अर्थात् हिन्दीचें क्षेत्र फार मोठें व विस्तीर्ण आहे. सुमारें पंचवीस कोट लोक हिन्दी भाषा प्रत्यहीं बोलतांना उपयोगितात. ह्याच एका महत्वपूर्ण दृष्टीनें दुसऱ्या कोणत्याहि भाषेचें आक्रमण होऊं न देतां हिन्दी हीच आपली अर्थात् सर्व हिंदुस्तानची राष्ट्रभाषा (Lingua Franca) म्हणून विराजमान होणार एवढें निश्चित.फार तर काय पण संपूर्ण अशिया खण्डांतील पूर्वेकडील बहुतेक देशांत तिला आपल्या सुगमावबोधत्वामुळे श्रेष्ठ मान-मिळून कालांतरानें आशिया खण्डाची राष्ट्रभाषा म्हणून मिरविण्याचा मान मिळावा अशी सद्भावना Asia for Asians या तत्त्वाप्रमाणें कोणी धरल्यास आजच्या काळांत तें अस्थायी होणार नाहीं.

मध्यभारतीय हिन्दी साहित्य संमेलनांत (डिसेंबर १९४२) स्वागताध्यक्ष श्रीमान् **रावराजे राजरत्न सर शेठ हुकूमचंदजी डागा** म्हणतात, "हिन्दी ही आज राष्ट्रभाषेच्या सिंहासनावर विराजमान झालेली आहे. व त्या स्थानावर ती अढळच राहील. गेल्या पावशतकांत हिन्दी भाषेइतकी प्रगति कोणत्याहि

भारतीय भाषेची झालेली नाहीं. हिन्दीचा भविष्य काल शुभ. दिव्य नि सुंदर असा आहे असें माझें पूर्ण मत आहे. अखिल भारतांत तिच्या उत्तरोत्तर होणाऱ्या द्रुत विस्तारामुळें तिच्या भावी अुत्कर्षाचा अंदाज आज शुभसूचक आहे एवढें खास."

देवास नरेश राजे विक्रम सिंहजी पवार यांनीं मध्य भारतीय हिन्दी साहित्य संमेलना (डिसेंबर १९४२) मध्यें अध्यक्षीय भाषणांत आपलें निश्चित मत दिलें आहे. "हिन्दीचें वाग्वैभव उच्चकोटींचें आहे. भारतांतील सर्व भाषा संस्कृत भाषेच्या औरस किंवा दत्तक कन्या आहेत. आणि या सर्व भाषांतून भगिनीप्रेम दिसून येतें सर्वच भाषा आपापल्या ठिकाणीं सुसंपन्न असून आपापल्या घरीं थाटानें संसार चालवीत आहेत. आणि या सर्व भगिनींत हिन्दी हीच सर्वांत मोठी (वडील) आहे हें कोणीहि कबूल करील. तसेंच ती मातृमुखी असल्यानें तिच्यांत संस्कृत शद्ब व रूपें प्राधान्यत्वेंकरून दिसून येतात. मराठी ही हिन्दीची धाकटी बहिण आहे."

Proverbs are best teachers.

लोकव्यवहार, शिष्टाचार, लोककथा तसेंच व्यक्तिगत ज्ञान व अनुभव यावर म्हणींची उभारणी व त्यांचा इतिहास अवलंबून असतो हें विसरतां कामा नये. पुष्कळशा म्हणी वरील कारणांनीं रूढ झालेल्या आहेत. मुसलमानांचें या देशावरील आक्रमण हेहि हिन्दी म्हणींत, आरबी, फारशी शद्बांचा अंतर्भाव होण्यास कारणीभूत झालेलें आहे.

Proverbs are peoples' Demonstrations.

विद्वान् मुर्ख, साक्षर, निरक्षर, स्त्री, पुरुष, लहान, थोर, नागरिक खेडवळ इ. इ. सर्व लोकांना नित्याचे भाषणांत किंवा लेखनांत म्हणी वाक्प्रचार, सुभाषितें यांचा उपयोग करण्याची जन्मजात कमी जास्त आवड असतें. अर्थात् आवड, निवड, नि सवड पाहून मनुष्य त्यांचा उपयोग करीत असतो. आपल्या राष्ट्रभाषेंत म्हणींची रचना, त्यांचा वाच्यार्थ, भावार्थ व प्रयोग कसे आहे हें समजणें हिन्दीचे अभ्यासकांस अत्यंत आवश्यक आहे.

हिन्दी भाषेचें क्षेत्र मोठें व व्यापक असल्यानें प्रांतपरत्वें प्रान्तीय भाषांमधून म्हणींच्या रूपांमध्यें व शद्वयोजनेंत फरक दिसून येतो. तसेंच व्रज, बुंदेली, कनोजी, मालवी इ० भाषांतून (Dialect) भिन्न शद्वोच्चार आढळतात. एकाच म्हणींत शद्वबदल व पर्याय शद्व घालून अनेक म्हणी झालेल्या दिसून येतात. त्यांचा शक्य तो संग्रह करून उपयोग केला आहे.

मराठी प्रमाणेंच हिन्दी म्हणीमध्यें अलंकार, अर्थ गांभीर्य, सभ्यता यांचा अंतर्भाव झालेला दिसून येतो तसेंच बीभत्स म्हणींचा उपयोग खेडवळ जनतेंत होतो. असें नसून जरूरीप्रमाणें त्या उपयोगिल्या जातात. कित्येक म्हणींचा इतिहास किंवा उगम मोठा मनोरंजक आहे. कांहीं म्हणी प्रसंग आणि व्यक्तींचा अनुभव एकत्र होऊन व्यवहारांत प्रचलीत झाल्या आहेत. अुदा० 'अस्तबलकी बलाय बन्दरके सिर" ही म्हण पहा. एका तबेल्यांत कांही घोडे बांधले होते. तेथेंच एक वानर बांधलें होतें. एके दिवशीं सकाळीं सर्व घोडे सुटून मोकाट पळतांना दिसले. चौकशी अन्ती एकानें हें वानराचें कृत्य असावें असें सांगितलें. वानर बांधलेलेंच होतें. तरी हा आरोप त्यावर लादला गेला. दुसऱ्यानें वानर तर बांधलेलें आहे तेव्हां त्याचें हें काम नव्हे. कोणातरी खोडकर मानसाचें हें कृत्य आहे असें सांगितलें पहिल्यानें उत्तर दिलें. 'घोडे सोडून दिल्यावर पुन्हां आपलें गळचांत दावें अडकविण्यास वानरास कठीण नाहीं' झालें. वानरावर आरोप शाबीत झाला. "अजापुत्रो बलिं दद्यात्' आणि त्यांचे पर्यवसान अुपरिनिर्दिष्ट म्हणोंत झालें. असें म्हणतात असो.

अशा प्रकारच्या गोष्टीवरून व दन्तकथावरून झालेल्या म्हणी भोजराजा बिरबल इ. विद्वान् लोकांच्या वेळीं फार रूढ झाल्या 'कहाँ राजा भोज और कहाँ गंगुतेली' 'तोडरमलका पेट और जगत् की हांसी' 'डूबा वंश कबीरका' 'सो दिल्ली अुज़ड गयी'या म्हणीसुद्धां हिन्दी भाषेंत समयानुसार रूढ झाल्या आहेत. मुसलमानी राजांच्यावेळीं अरबी व फारशी म्हणींचाहि हिन्दी स्वरूपांत अंतर्भाव झालेला दिसून येतो

हिन्दी व हिंदुस्तानी

सांप्रत हिंदी व हिंदुस्तानी वादानें आकाश पाताळ एक होऊन राहिलें आहे. या मतभेदासंबंधीं हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री **पुरुषोत्तमदासजी टंडन** यांचे अधिकार युक्त व माननीय विचारपुढें दिले आहेत. सन १९४१ दिनांक १८ जून ला त्यांनीं पुणें मुक्कामीं प्रमाणपत्र वितरण समारंभप्रसंगीं खालील भाषण केलें त्यांत ते म्हणाले:–

संस्कृत व हिन्दी यांचा निकट संबंध असल्यामुळे हिन्दी भाषेंत संस्कृत भाषेचा भरणा असणारच व त्याच पूर्व परंपरागत उर्दु व फारशी शद्ब आले ते हि वापरले जातील. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं, सर्व सुलभ संस्कृत शद्बांच्या जागी मुद्दाम अरेबिक शद्बांचा भरणा करावा. तें आम्हांस केव्हांहि मान्य होणार नाही. आर्य संस्कृति कायम राहील अशी हिंदी भाषाच राष्ट्र-भाषा म्हणून राहील व राहिली पाहिजे. परंतु राष्ट्रभाषा व साहित्यिक हिन्दी भाषा यांत थोडा फरक राहाणारच. राष्ट्रभाषा ही सर्व हिंदुस्थानांतील सर्व साधारण जनतेला सहज समजेल अशीच राहील. त्यांत अरेबिक व फारशी शद्ब येतील हें खरें.पण त्या बरोबर मराठी,गुजराती, बंगाली या भाषांतीलहि शद्ब साधारणतः त्यांत येतील. नुसते अरेबिकच असू द्या असें म्हणून चालणार नाहीं. त्याच बरोबर राष्ट्रीयत्वाचा भंग होईल अशी हिन्दी भाषा होता उपयोगी नाहीं.

बाजारू हिन्दी ही आज मोठ्या प्रमाणांत सर्व आशिया खण्डांत बोलण्यांत येत आहे. तिला कांहीं लेखकांचे लेखणींतून साहित्यिक स्वरूप मिळूं लागलें आहे. उत्तरोत्तर तिचा विकास होऊन तिचा आजच्या साहित्यिक हिन्दीची व साहित्यिक उर्दूची जागा पटकावणार नाहीं हें कशावरून ? बदलत्या काळांत भाषाबदल हा यथाक्रमच होय. तसें झाल्यास सामान्य जनतेची भाषा तीच राष्ट्रभाषा हा सिद्धान्तच प्रभावी ठरेल. व तिलाच सर्व लोक हिन्दी असें योग्य नांव देतील."

वरील सर्व गोष्टी गृहीत धरून आज जनसमाजाची प्रवृत्ती हिन्दीकडे आहे हें खालील सरकारी माहिती वरून कळेल.

१९४०-४१ सालांत हिन्दी पुस्तक प्रकाशनाचें व अुर्दू पुस्तक प्रकाशनाचे आंकडे.

प्रांत	हिन्दी पुस्तकें	अुर्दू पुस्तकें	शें. प्रमाण	
संयुक्तप्रांत	११५२	२१८	हिं. ६१	अु. १०
पंजाब	२४१	९८५	१३	५४
अजमेर–मारवाड	७२	०	८६	०
बिहार	६७	०	४३	०
बंगाल	१२४	१९	२३	०

त्याचप्रमाणें जनतेमध्यें बोलपटांची लोकप्रियता पहा. सन१९४२सालीं बंगाली चित्रपट १५; मराठी १३; हिन्दी ९९ याप्रमाणें नवीन तयार करण्यांत आले. परंतु उर्दू बोलपट एकही नाहीं. या वरून सर्व साधारण जनतेचा हिन्दीकडे विशेष कल आहे हें दिसून येईल.

या कोषाची रचना

हिन्दी भाषेमध्यें साहित्य भाण्डार फार मोठें आहे. कहावतींचा भरणा जवळ जवळ तीन चार हजार आहे.त्यांतील सुमारे२५००म्हणी यांत दिल्या आहेत. हिन्दी म्हणींचा वाच्यार्थापेक्षां भावार्थ दिला असून कठीण म्हणींचा मराठी अर्थ दिला आहे. तुलना व साम्य या दृष्टीनें पुष्कळशा मराठी म्हणी दिलेल्या आहेत. तसेंच हिन्दी कहावतीचे सुलभ हिन्दींतच स्पष्टीकरण दिल्यानें अुत्तर हिंदुस्तानांतील विद्यार्थ्यांना त्याचा फार उपयोग होईल.हिन्दी म्हणींतील कठीण शद्बांचा अर्थ म्हणी पुढेंच व पुस्तकाचें शेवटीं वेगळा दिला आहे. अुपरोधिक किंवा व्यंगोक्तिदर्शक म्हणी सहज समजतील अशा दिलेल्या आहेत. प्राय: सर्व विश्वविद्यालयांतून हिन्दी भाषेच्या अभ्यासाला महत्व देण्यांत आले असून शालेय क्षेत्रांत तिला परीक्षा विषयांत स्थान मिळालें आहे. हिन्दी भाषेचें महत्व अुत्तरोत्तर वाढत राहणार यांत संशय नाहीं. अभ्यासकांस हिन्दी व मराठी या भाषाभगिनी किती निकटसंबंधी आहेत हें कळून येईल.त्यांचा तौलनिक अभ्यास व्हावा हें जाणून नित्याचे व्यवहारांत येणाऱ्या मराठी म्हणींचा बराचसा अुपयोग केला आहे.

महाराष्ट्रीय साधुसंतांच्या वचनाप्रमाणेंच हिन्दींतील तुलसीदास, सूरदास, कबीर इ. साधुपुरुषांच्या सदुक्ति म्हणीरूप झालेल्या आहेत त्यांना महाराष्ट्रीय सुभाषितांचे अनुवाद दिले आहेत. अुदा० पराधीन सपनेहुँ सुख-

नहीं । परवशता शतगुणें करी जाच. प्रभुता पाय जाय मद नाहीं । अत्युच्चीं पदि थोरही बिघडतो. भाग्यवान के खेतको, जोत जात है भूत । भाग्यवंताचे घरीं स्वत: देव काम करी.

या कोषांतील म्हणींचा संग्रह करतांना बऱ्याच पुस्तकांची मदत झाली. कहावत-दर्पण [कोष], मुहावरे कोष, कहावत-रत्नमाला, Hindi Idioms, हिन्दी शब्दसागर, उर्दू मसल या सारख्या पुस्तकांचा उपयोग झाला आहे. त्यांच्या संपादकांचे व प्रकाशकांचे मन:पूर्वक आभार मानणें हें मी माझें आद्य कर्तव्य समजतों.

सांप्रतच्या जागतिक आंदोलनांत बऱ्याचशा राष्ट्रभक्तांनीं आपापला वांटा यथाशक्ति उचलला आहे. अशावेळीं तदभावीं राष्ट्रभाषेची सेवा आपले हातून घडावी हा उद्देश १९३९ पासून मनांत धरला त्याचें फल आज दृश्य स्वरुपांत आलें आहे. मुख्य मुख्य कहावतींचे प्रयोग छापले असते तर पुस्तक सुमारें ४०० पानांचें झालें असतें.कागदाच्या महर्गतेमुळें तें युद्धोत्तर कालावर टाकणें भाग आहे.

आभार

या पुस्तकाचे चांगलेपणाबद्दल श्री. गोपीवल्लभ अुपाध्याय, अुज्जैन; श्री. ग. र. वैशंपायन, श्री. गो. प. नेने, पुणें; श्री. दे. भा. लेले, संगमनेर व छपाई बद्दल लोकसंग्रह कारखान्याचे व्यवस्थापक यांचे आभार मानून हिन्दी भाषाप्रेमींनीं 'हंसक्षीरन्यायानें' ही माझी सेवा गोड करून घ्यावी, शुद्धीपत्रांतील दोष शुद्ध करून घ्यावेत व राहिलेले दोष कळवावेत अशी नम्र विनंती आहे. हिन्दी वाक्संप्रदाय कोष हा बहुतेक तयार झालेला आहे. जागतिक महर्गतेमुळें पुढें यथाकाल मुद्रित होईल.

शेवटीं, महाराष्ट्र राष्ट्र–भाषा प्रचार समितीनें नेमलेल्या हिन्दी पुस्तक पुरस्कार समितीनें हा कोष पुरस्कृत केला याबद्दल त्या समितीचे अध्यक्ष, मंत्री व सभासद यांचा मी फार आभारी आहें.

अहमदनगर
टिळक जयंती १९४३ } —शंकर गंगाधर जोशी

कहावत-कोश
और
सुभाषित-संग्रह

अ

अक़्लके पीछे लाठी लिये फिरना :—महामूर्ख बनणें, मूर्खासारखें वर्तन करणें. महामूर्ख व्यक्तिको तरह काम करना। अक़्लको तिलांजलि देना। बे अक़्ल काम करना।

अक़्ल खुरा जगसे बुरा :—माझेंच घोडें नि जाऊं द्या पुढें, असा स्वार्थी. अप्पलपोटा अतिशय खोटा. ज्याला नाहीं अक्कल त्याची घरोघर नक्कल. अक़्लहीन आदमी निन्दनीय होता है। अक़्लखुरा —बुद्धिहीन.

अक़्ल बड़ी कि भैंस :—जाडजूड शरीरापेक्षां बुद्धि श्रेष्ठ. भैंसकी तरह पुष्ट होनेमें श्रेष्ठत्व नहीं है। ताकतसे अक़्ल बड़ी। भैंस—म्हैस.

अकाल मृत्युमें मुक्ति नहीं :—आत्महत्या वा अपमृत्युनें शांति नाहीं. अकाल (असामयिक) मृत्युसे मोक्ष नहीं मिलता। अकाल मृत्यु—अपमृत्यु, अकालीं येणारें मरण.

अकेला चना भाड़ नहीं फोड़ता :—कोणतेंही कठिण काम अेकजण करूं शकत नाहीं. अेक आदमी बहुतोंके मुकाबिलेमें कुछ नहीं कर सकता। कोअी भी कठिन कार्य अेक व्यक्तिसे नहीं हो सकता। भाड़—जात्याची तळी किंवा भट्टी, अकेला—अेकटा.

अकेला चले न बाट, झाड़ बैठे खाट :—प्रवासांत अेकटेच चालणें बरें नाहीं, पलंग किंवा खाटेवर बसण्यापूर्वीं त्याला झाडून किंवा जमिनीवर आपटून घेणें अुत्तम. कोणतेंही कार्य सुरू करण्यापूर्वीं

नीट विचार करणें बरें. **काम शुरू करनके पहले अुसपर विचार करना अुचित है । बाट–मार्ग. खाट–पलंग.**

अक़्लमंदको अिशारा काफ़ी :—शहाणा तर्कानें जाणतो. **बुद्धिमान् अिशारोंसे बात समझ लेते हैं ।**

अक़्लमंदको अिशारा, मूर्खको तमाचा :—शहाण्यास शब्द, मूर्खास मार.

अकेली लकड़ी न जले न अुजाला करे :—विस्कळित राहिल्यानें यश मिळत नसतें. **अलग अलग रहनेमें अपयश मिलता है; और कुछ भी कार्य नहीं होता ।**

अगला करे पिछले पर आवे :—पुढचा करी (मागचा) पाठचा भरी. **बड़ोंकी भूल छोटोंको भुगतनी पड़ती है ।**

अकेले दुकेलेका अल्लाह बेली :—गरिबांचा वाली परमेश्वर असतो. **अनाथका साहायक अीश्वर होता है ।**

अकेली कहानी गुड़से मीठी:—अेकतर्फी हकीकत अैकण्यास गोड वाटते, कारण दुसरी बाजू अैकतांच तिचा नूर बदलतो.

अगले पानी पिछले कीच :—पुढें पाणी मागें गाळ. विलंब वाअीट. हजीर तो वजीर। जगांत नेहमीं पुढें राहणें बरें. **आगे आया आगे बढ़ा, विलंब करनेसे हानि होती है । (कीच–चिखल) (पिछला–मागचा) (अगला–पुढचा)**

अच्छा कमाना अच्छा खाना :—चांगलें मिळवावें चांगलें खावें; कष्टानें निर्वाह करावा; आरामशीर राहावें. **श्रम करना और आरामसे जीवन निर्वाह करना ।**

अटकल पच्चू डेढ़ सौ :—अदमास पंचे दीडशें. अनमान धक्का गोष्टी सांगणें. **अंदाज़ से बातें (काम) करना ।** अंदाज़ लडाना.

अटका बनिया देय अुधार :—अडलेला मनुष्य सर्व कांहीं करतो. अडला नारायण गाढवाचे पाय धरी, अडला वाणी अुधार देअी. **दबा आदमी सब कुछ करता है ।**

अटकेगा सो भटकेगा :—शंकेखोर दु:खी असतो. अडला तो नडला. अडेल तो पडेल. **शक्की आदमी हरदम दु:खी रहता है । अटका सो भटका ।**

अंडा सिखावे बच्चेको कि चीं-चीं मत कर:—लहान तोंडीं मोठा घांस. लहानानें मोठ्यास शिकविणें. **जब छोटा बड़ेको अुपदेश देने लगे तब कहा जाता है।**

अंडे होंगे तो बच्चे बहुतेरे हो रहेंगे:—धन असेल तर व्याज भरपूर मिळेल. सिर सलामत तो पगड़ी पचास. **पूँजी रहेगी तो ब्याज मिलता रहेगा।**

अंत बुरेका बुरा अंत भलेका भला:—ज्याचा शेवट वाओीट तें वाओीट. ज्याचा शेवट गोड तें गोड. **अंतमें बुरेका फल बुरा और भलेका भला होता है।**

अन्ते मता सो गता। (अन्ते मतिः सा गतिः):—मरतांना जशी अिच्छा तशी गति. **मृत्यूके समय जैसी मति वैसी गति।**

अतिभक्ति चोरका लक्षण:—ढोंगी मनुष्य चोर असतो. लघळपणा करणारा वाओीट. **ढोंगी आदमी दुष्ट (चोर) होता है।**

अन्दरकी बात राम जाने:—पोटांत काय ते ओीश्वराला ठाअूक. **जिसकी बाहरी बातचीतपर शंका हो, अुसके लिअे अैसा कहा जाता है।**

अधजल गगरी छलकत जाय:—थोडें ज्ञान दिखाअू काम. अुथळ पाण्याला खळखळाट फार. **ओछा घड़ा छलके घना छोटा आदमी बड़ी डींग मारता है। (गगरी**–घागर, **घडा। छलकत**–हिसळत.)

अंधा क्या चाहे? दो आंखें:—आंधळा मागें दोन डोळे. मनुष्य गरजेप्रमाणें मागणें मागतो. **इच्छाका पूर्ण होना, जैसी गरज वैसी अरज।**

अंधा बगुला कीचड़ खाय:—पंगू मनुष्याला खराब वस्तूचा लाभ. **अनाड़ीको बुरी चीजका लाभ।**

अंधा क्या जाने बसंतकी बहार:—आंधळ्याला न पाहिलेल्या वस्तूची काय कल्पना? आंधळ्याला सारें जगत आंधळेंच. **न देखी हुअी चीजका महत्त्व मालूम नहीं होता।**

अंधा गाय बहिरा बजाय:—आंधळा गाओी बहिरा ताल धरी.

अंधा गुरु बहिरा चेला:—आंधळ्याबहिऱ्यांची गांठ. **मूर्ख और अनाड़ी साथियोंका मिलाप।**

अंधा सिपाही कानी घोड़ी विधिने खूब मिलाओी जोड़ी:—दोन

अैटखोर व निकामी व्यक्तींची जोडी. **निकम्मे और अैबवाले आदमियों-की जोड़ी।**

अन्धेके लिअे जगत् अन्धा :—आंधळ्याला सारें जग आंधळें.

अंधा पीसे कुत्ता खाय :—आंधळे दळतें कुत्रें पीठ खातें. **जब अेकके कमाये हुअे धनका दूसरा अुपभोग करता है।**

अंधी बाटे जेवरी, पीछे बकरा खाय :—अेक करी कमाअी दुसरा फुकट खाअी. **अंधा रस्सी बटता जाय; बछड़ा बैठा खाता जाय।**

अंधा बाँटे शिरनी फिर-फिर अपनेको दे :—अधिकार प्राप्त झाल्यावर स्वत:ची तुंबडी भरणें. आपल्याच पोळीवर तूप वाढून घेणें. **अन्यायी अपनाही भला करता है।**

अंधा मुल्ला टूटी मसीद (मस्जिद्) :—मोडक्या तोडक्या वस्तू. **सब चीजें निकम्मी और निरुपयोगी होना।** (**टूटी**—मोडकी तोडकी)

अंधा राजा चौपट नगरी :—अंदाधुंदीचा कारभार. जुलमी राज्य. बेबंदशाही. **अंधेर नगरी चौपट राजा. टके सेर भाजी, टके सेर खाजा। सब घोड़े बारह टके।**

अंधी आँखोंमें काजल सोहे, लंगडे पावमें जूता :—आंधळ्याच्या डोळ्यांत काजळ व लंगड्याच्या पायांत जोडा, ह्या विसंगत गोष्टी शोभत नाहींत. **अन्धी आँखमें काजल और लंगडे पाँवमें जूता, ये बातें असंगत होनेसे शोभा नहीं देती.** (**सोहना**—शोभणें. **जूता**—जोडा.)

अंधेके आगे रोवे, अपने नैन खोवे :—अन्यायी मनुष्याबरोबर न्यायाकरतां झगडणें व्यर्थ. गाढवापुढें वाचली गीता अि० **अन्धेके आगे रोना, अपने दीदा खोना।** (**दीदा**—दृष्टि, डोळे. **खोना**—गमावणें.)

अंधे के आगे हीरा कंकड़ बराबर :—वा. आंधळ्याला हिरा व गारगोटी सारखीच. मूर्खाला ज्ञानी व अज्ञानी सारखेच. **मूर्खके लिअे अपढ़ और ज्ञानी बराबर होते हैं।** (**कंकड़** कंकर—दगड, गारगोटी.)

अनीके बस कनी खाना :—पाणी किंवा तुपाबरोबर कण्या गिळणें. चांगल्याबरोबर वाअीटाचा अुपयोग.

अनमांगे मोती मिले, मांगे मिले न भीख :—न मागे तयाची रमा

होय दासी । संतुष्ट आदमीको बिनाकष्ट सबकुछ मिलता है । मांगनेवालेको और लोभी आदमीको बहुत कष्ट अुठाकर भी कुछ नहीं मिलता । (अनमांगे–न मागतां.)

अंधेकी जोरू, खुदा रखवाला :—आंधळ्याच्या गाअी देव राखी. अीश्वर अनाथकी सहाय करता है ।

अंधेके हाथ बटेर लगना :—नालायक मनुष्याला भाग्य येणें. अयोग्य को कोअी अच्छी वस्तु बिनाकष्ट मिलजाना । (बटेर–अेक पक्षी, शिकार.)

अंधेको अंधेरेमें बड़ी दूरकी सूझी :—आंधळा धोरणी असतो. अंधा दूरदर्शी होता है । (सूझी–सूझना–दिसणें, समजणें).

अंधोंमें काना राजा :—आंधळ्यांत चकणा पंडित. मूर्खांत अर्धवट शहाणा ज्ञानी. मूर्खोंमें अल्पज्ञानी सर्वज्ञ समझा जाता है ।

अधेला न दे अधेली दे :—थोडें देण्यास नाखूष, त्याला अधिक भरावें लागतें. खुशीसे थोड़ीभी वस्तु न देना किन्तु दबावमें आकर ज्यादा दे देना । दमड़ी न दे चमड़ी दे ।

अनदेखा चोर बाप (राजा) बराबर :—पाहिला तर चोर नाहीं तर बादशहाहून थोर. अनदेखा चोर साले बराबर ! विनादेखे किसीको दोष लगाया नहीं जाता.

अनजानको दोष नहीं :—अजाणपणें झालेली चूक क्षम्य असते. गलती करनेवाला अनजान हो तो निर्दोष होता है ।

अनहोतमें औलाद :—दुष्काळांत तेरावा महिना. दरिद्रतामें ज्यादा खर्च. नको तेव्हां संतानप्राप्ति. (औलाद–संतति, अनहोतमें–अनिच्छा-समयीं.)

अनाड़ीका सौदा बारहबाँट :—मूर्खाचा व्यवहार बिघडतो. मूर्ख सर्वत्र फसतो. मूर्खका काज हमेशा बिगड़ता है । (अनाड़ी–अर्धवट).

अपना अपना कमाना, अपना अपना खाना :—कोणाशीं संबंध न ठेवणें. आपल्यापुरतें पाहणें. किसीसे संबंध न रखना । स्वतंत्रतासे रहना ।

अपना घर दूरसे दीखता (सूझता) है :—आपलें घर (परिस्थिति) लांबून कळतें. दूर देशमें भी अपने घरकी हालत का ज्ञान रहता है ।

अपना टेंटर न देखकर, दूसरेकी फूली देखे :—दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दिसतें आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं. **अपने बड़े दोषको न देखकर दूसरेके छोटेसे छोटे दोष देखना । अपनी टेंट न निहारे । आन की फूली । टेंटर–टेंट–बड़ा निशान । फूली–छोटा निशान ।**

अपना पैसा (माल) खोटा तो परखैयेका क्या दोष :—आपला दाम खोटा तर पारखणाराचा काय दोष? **अपने घरके आदमीके दोष क्या दिखाना?** घरचें रांडरू नाहीं धड दुसऱ्यास काय दोष? **हममें बुराअी होनेसे दूसरे हमें अवश्य बुरा कहेंगे । (परखैया–**पारखी.)

अपना लाल गँवायके, दरदर माँगे भीख :—आपली वस्तु हरवून दुसऱ्याकडे भीक मागणें. आपला गेला लाख दारोदार मागें भीक. **अपनी चीज गँवाकर दूसरोंके आगे हाथ पसारना । (गँवायके-गँवाकर–**गमवून.)

अपना वही जो काम आवे :—वेळेवर कामीं येअील तो आपला मित्र, प्रसंगीं उपयोगीं पडेल तेंच खरें आपलें. **समयपर काम आवे वही अपना ।**

अपना हाथ जगन्नाथका भात :—आपल्या पोळीवर तूप ओढणें. आपला फायदा करणें. **किसी वस्तुको मनचाहे वैसा लेना । (मन चाहे वैसा–**स्वतंत्रतापूर्वक.)

अपना सो अपना, बाकी पालीका ढकना :—आपला तो बाब्या नि दुसऱ्याचें तें कारटें. आपला तो आपला व अितर भाजीपाला. **दूसरोंकी अुपेक्षा करना, अपनेको अधिक चाहना ।**

अपना मरना जगत्की हांसी :—आपलें मरण (नुकसान) जगाचें हांसूं. **अपना नुकसान देखकर दूसरोंका प्रसन्न होना ।**

अपनी पगड़ी (अिज़्ज़त) अपने हाथ :—आपली पत आपल्या हातीं. **अपनी अबरू आप ही रखनी चाहिअे । किसी ओछेके मुँह न लगना अच्छा ।**

अपनी ग़रज़ बावली होती है :—गरजवंताला अक्कल नसते. **स्वार्थके लिअे आदमी नीच काम भी करता है । अपनी ग़रज़के लिअे लोग गदहा भी चराते हैं ।**

अपनी गलीमें कुत्ता शेर :—आपल्या घरीं सर्वच समर्थ. कुत्र्याचें भुंकणें घरापाशीं. **निर्बल अपने घरपर बलवान् होता है ।**

अपने दहीको (छाछको) खट्टा कौन कहता है ? :—आपल्या वस्तूला वाओीट कोण म्हणेल ? **हरकोओी अपनी चीजको अच्छी बताता है । असको कोओी बुरी नहीं कहता ।**

अपनी बुद्धि, पराया धन, सबको बड़ा मालूम होता है :—मनुष्य स्वतःला मोठा बुद्धिमान् व दुसऱ्याचें धन फार मोठें समजत असतो.

अपनी अपनी डफली (ढपड़ी) अपना अपना राग :—आपल्या नादांत (तालांत) राहणें. आपली टिमकी नि आपलेंच गाणें. अव्यवस्था प्रसंग; **अेकका दूसरेसे कुछ संबंध न रखना । अेकतासे काम न करना ।** (**डफली**—डफड़ी टिमकी, डफडें. **राग**—गाणें.)

अपनी नाक कटाकर दूसरेका सगुन बिगाड़ना :—दुसऱ्याचें नुकसान करण्याकरितां स्वतःच्या नुकसानीची पर्वा न करणें. स्वतःचे नाक कापून दुसऱ्यास अपशकून. **अपनी नाक कटी सो कटी दूसरेका सगुन बिगड़े ।** (**सगुन**—शकुन.)

अपनी नाक कटी सो कटी; पराओी बद-शगुनी तो हुओी :—**दूसरेके नुकसानके लिअे अपना भी नुकसान करना । दूसरेके नुकसानसे खुष होना ।**

अपने अपने ख्यालमें सब मस्त हैं :—जो तो आपल्या परिस्थितींत दंग असतो. । **अपनी दशामें सब प्रसन्न रहते हैं। (ख्याल**—विचार.)

अपनी करनी पार अुतरनी :—आपण करूं तें काम. काम पूर्ण व्हावें असें वाटत असेल तर आपणच केलें पाहिजे. **शुरू किया काम अपने ही हाथसे पूरा होता है ।**

अपनी करनी आप भरनी :—करावें तसें भरावें. **जैसी करनी वैसी भरनी । किये हुअे कार्यका फल स्वयंही भोगना ।**

अपने-अपने घरमें हरकोओी बादशाह :—आपले घरीं आपण राजे. **अपने घरमें किसीका डर नहीं होता ।**

अपने गांवका जोगड़ा, आन गांवका सिद्ध :—अेके गांवचा गोसावडा दुसरे गांवीं सिद्ध. (**आन**. अन्य, दूसरा)

अपने मरे विना स्वर्ग नहीं दीखता :—स्वत: मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नसतो. अपने आप तकलीफ उठाये विना कार्य नहीं होता।

अपने मुँह धन्नाबाओी। (अपने मुँह मियाँ मिट्ठू) :—आत्मस्तुति करणें. आपल्या तोंडावरून दिवे ओवाळणें. स्वयंही अपनी प्रशंसा करना।

अपने हाथ पाँवमें कुल्हाड़ी मारना :—स्वत:चे पायांवर धोंडा पाडून घेणें. अपना नुकसान आपही करना।

अब पछताये होत क्या, चिड़ियाँ चुग गओीं खेत :—बैल गेला नि झोंपा केला. समय निकल जानेपर पश्चात्ताप करना व्यर्थ है।

टीप—ह्या म्हणीचा पूर्वार्ध :—आछे दिन पाछे गये, किया न हरिसे हेत। अब पछताये अि.

अबराकी जोरू सबकी भौजाओी :—गरीब सर्वांचा मिंधा असतो; गरीबाची गृहिणी सर्वांची वहिनी. गरीबको सब दबा लेते हैं। (अबराकी जोरू–गरीबकी लुगाओी–गरीबाची बायको.)

अभी तो तुम्हारे दूधके दाँत भी नहीं टूटे। अभी तो तुम्हारे होंठोंका दूध भी नहीं सूखा :—अद्याप तुला जगाचा अनुभव नाहीं. अभी तुमने दुनियाँ को नहीं पहिचाना। तुम अनजान हो। अभी तो माँका दूध पीते हो। अभी तुम बच्चे हो।

अभी तो बेटी बापकी है :—अजून गोष्टी ताब्यांत आहेत. अजून मुलगी मांडवांत आहे. करना हो तो अब भी सब-कुछ हो सकता है। विवाहोत्तर बेटी दूसरेकी होती है।

अमरौती खाकर कोओी नहीं आया :—अमरपट्टा घेऊन कोणी आलें नाहीं। सबको मरना है। जातस्यहि ध्रुवो मृत्युः। (अमरौती–अमरत्व. खाकर–खाऊन.)

अस्तबलकी बला बन्दरके सिर :—अेकाचा दोष, दुसऱ्यावर रोष. विना संबंध अेकका दोष दूसरेपर डालना, या दूसरेके सिर मढ़ना।

अमीरको जान प्यारी, फ़कीरको दम भारी :—श्रीमंताला जीव प्यारा. गरीबाला जीव जड (ओझें) वाटतो. धनीको मृत्युसे डर, गरीबको नहीं।

अमीरका उगाल गरीबका आधार :—श्रीमंताचा अुतारा गरीबाचा गुजारा. गरीबके लिअे सामान्य वस्तु भी कामकी होती है।

अरहरकी टट्टी गुजराती ताला :—दमडीची वस्तु लाखेची मोहोर. **तुच्छ वस्तुकी रखवालीमें बहुत खर्च होना ।** (अरहर–तुरीच्या झाडाच्या वाळलेल्या काड्या–तुराट्या. टट्टी–कुडव.)

अल् खामोशी नीम रज़ा :—मौन धरणें अर्धी कबुली. मौनं संमति लक्षणम् । **चुप रहना स्वीकृति तुल्य है ।**

अला-बला बन्दरके सिर :—संकटाची जोखीम गरीबाच्या माथीं. अजा पुत्रो बलि दद्यात् । **कमज़ोरके सिर दोष ।**

अशर्फ़ियाँ लुटें, कोयलेपर छाप :—जाईल तेथें हत्ती, नाहीं तेथें मुंगी जाणार नाहीं. **द्रव्यका अपव्यय करना, परन्तु मामूली खर्चमें कंजूसी करना ।**

अस्सीकी आमद, चौरासीका ख़र्च :—मिळकतीपेक्षां अधिक खर्च. कमी आय अधिक व्यय. प्राप्ति अैशीं खर्च चौऱ्यायशीं. **आमदनीसे अधिक ख़र्च ।**

आ

आँख ओझल पहाड़ ओझल :—डोळे मिटतांच डोंगर झांकतो. दृष्टि-आड सृष्टि. (ओझल-अदृश्य, आड करणें, झांकणें.) **आँखकी ओट करनेसे पहाड़ भी छिप जाता है ।**

आँख और कानमें चार अंगुलका फ़र्क है :—कोणतीही गोष्ट पाहणें व अैकणें यांत फरक आहे. प्रत्यक्ष तें खरें. **देखनेमें और सुननेमें अंतर है । देखे बिना किसी बातका विश्वास नहीं करना ।**

आँख फूटी पीर गयी :—डोळा फुटला पीडा गेली. महार मेला विटाळ गेला. **दुःखदायक वस्तुका त्यागही अच्छा होता है ।**

आँख बची माल दोस्तोंका :—आपापली वस्तु सांभाळावी. **अपनी वस्तुकी निगाह रखनी चाहिअे ।**

आँखसे दूर तो दिलसे दूर :—दृष्टीबाहेर तें मनाबाहेर. **दूर रहने-पर प्रेम नहीं रहता ।**

आँखोंका अंधा नाम नैनसुख :—नांवाप्रमाणें करणी नसणें. नांव सोनुबाअी हातीं कथलाचा वाळा. **यथार्थ गुण न होना ।**

आँखों देखी कानों सुनी :—खरी व निश्चित गोष्ट. 'चक्षुर्वै सत्यम्' अशी गोष्ट. **आंखोंसे देखी हुअी निश्चित बात।**

आँखका अंधा गांठका पूरा :—वर बावळा, अंतरी नाना कळा. दिसायला साधा पण व्यवहाराला चोख. **अूपरसे सीधा परन्तु अन्तःकरणसे धूर्त। बड़ा होशियार।**

आँखोंका तारा :—अत्यंत प्रिय. **दिलसे प्यारा।**

आगे कुआँ पीछे खाअी :—अिकडे आड तिकडे विहीर. **दोनों बाजूसे संकट होना। शृंगापत्ति।**

आगे दौड़ पीछे चौड़ :—पुढें पाठ मागें सपाट. **आगे पढ़ते जाना और पिछला याद न रखना।**

आगे नाथ न पीछे पगहा :—केवळ अेकटें असणें. पिंपळावरचा मुंजा. **आगा न पीछा। न दोरा न धागा। कोअी सगा न होना। केवल अकेले दम होना।**

आगका जला आगसे अच्छा होता है :—अेकाद्या वस्तूनें तोटा तसा फायदा होतो. विषानें विष मरतें. प्लेगचें अिनॉक्युलेशन प्लेगदूषित अुंदरापासून करितात.

आग जाने लुहार जाने :—नवरा मरो नवरी मरो. ज्याचे तो जाणो.

आग लगे वह सोना, जिससे टूटे कान :—ज्यानें दुःख होअील तीं सद्भाषणें वाअीट. कान तोडील ती बाळी–बुगडी कशाला ? **अैसी सजावट व्यर्थ है जिससे नुकसान होता है।**

आग खायेगा तो अंगारे हगेगा :—वाअीटाचा परिणाम वाअीटच. **बुरे कामका नतीजा बुरा। नतीजा**–परिणाम.

आग बिना धुंआँ नहीं :—कारणाशिवाय कार्य नसतें. यत्र यत्र धूमस्तत्र तत्र वन्हिः। **बिनाकारण के कार्य नहीं होता।**

आज मेरे लिअे, कल तेरे लिअे :—चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे.

आठ वार नौ त्यौहार :—नेहमीं सण, अुत्सव असणें. वास्तविक वार सातच आहेत, परंतु आठ वारीं नअू सण करणें असा अर्थ मानला तरच भागेल. आपणही सात वार असून आठवडा म्हणतों.

आज नग़द कल अुधार :—आज रोख अुद्यां अुधार. अर्थ स्पष्ट है.

आज़ादी खुदाकी नियामत है :—स्वतंत्रता ही नैसर्गिक देणगी आहे.

आटेका दिया घरमें रक्खूं चूहा खाय, बाहर रक्खूं कौआ ले जाय :—अिकडे आड तिकडे विहीर. **बचाव करना मुश्किल होना। दोनों ओरसे आफ़तमें पड़ना। दिया**—चिराग.

आटेमें नौन सचमें झूठ :—पिठांत मीठ तितकें खऱ्यांत खोटें खपेल. **झूँठे बोल मीठे, जिस्से हड्डी न टूटे।**

आठ कनौजिये नौ चूल्हे :—आठ भैय्ये नअू चुली. भेदाभेद बोकाळणें; अैक्य नसणें. **अेकता न होना।**

आता है हाथीके मुँह, जाता है चिऊँटीके मुँह :—येअी गाजत जाअी लाजत. येअी धांवत जाअी रांगत. **चिऊँटी**—मुंगी. **आगमे सुखमाप्नोति निर्गमे प्राणसंकटम्।**

टीप :—लक्ष्मी येतांना दिसते, पण जातांना दिसत नाहीं, किंवा अेकादें दुखणें जोरानें येतें व हळुहळू बरें होतें या अर्थी लावतात.

आती बहू जनमता पूत :—वधूप्रवेश व पुत्रोत्सव सर्वांस प्रिय होत. **घरमें बहु आना और पुत्र जन्म होना सबको प्यारा लगता है।**

आत्मामें पड़े तो परमात्माकी सूझे :—आधीं पोटोबा मग विठोबा. **पेट भरनेपर सब बातें सूझती हैं। भूखे पेट अीश्वरभक्ति नहीं होती।**

आदम आया दम आया :—सृष्टीचा आरंभ आदमपासून झाला आहे. **आदमसे जगत शुरू हुआ है।**

आदमी-आदमी में अंतर, कोअी हीरा कोअी कंकर :—मनुष्या मनुष्यांत फरक असतो. पांचही बोटें सारखीं नसतात, कांहीं भले कांहीं बुरे. **सब आदमी अेकसे नहीं होते।**

आदमी जाने बसे, सोना जाने कसे :—मनुष्याची पारख संगतीनें, सोन्याची पारख कसोटीनें. **आदमी पास रहनेसे पहिचाना जाता है।**

आदमी हो या बूदम बेदाल :—मनुष्य आहेस कीं हैवान? **मूर्ख बूदम हो। आदमी**—मनुष्य. **बेदाल**—अतिनीच.

आदर न भाव, झूटे माल खाव :—मान न राहणें. खोटा सत्कार. **अनादर होना। मान-सन्मान न होना।**

आधी छोड़ सारीको धावे, आधी रहे न सारी पावे :— (अैसा

डूबे थाह न पावे) अर्धी सोडून सगळीकरितां धांवणारास दोन्ही मिळत नाहींत. थंतरमंतर काम करणें. **अधिक लालच नाश करता है । थाह**–थांग.

आधा तीतर आधा बटेर :—विजोड गोष्ट करणें. **गपड़सपड़ होना ।**

आधे गाँव दिवाली, आधे गाँव फाग :—मेळ नसणें; विसंगत स्थिति असणें. **बेमेल रहना । मेल न होना । फाग**–फाल्गुन. शिमगा, होळी.

आप करे सो काम :—मनुष्य स्वतः करील तें काम चांगलें होतें. आपण करूं तें काम. **आप काज महा काज ।**

आप खाय बिलाअी बताय :— आपण करून दुसऱ्यास दोष. **आप करके दूसरेको दोष दे । बिलाअी**–मांजर.

आप जिन्दा जहान् जिन्दा :—आपण जिवंत तर जग जिवंत. **जबतक खुद जिन्दा है तबतक दुनिया जिन्दी है ।**

आप डूबा सो डूबा, औरोंको भी ले डूबा :—आपल्या हानीबरोबर दुसऱ्याची हानि करणें. **अपनी हानिके साथ अन्यको हानि पहुँचाना.**

आप डूबा तो जग डूबा :—आपण मेलें जग मेलें. **आप मरे पीछे डूब गअी दुनिया । आप मरे जग परलौ । परलय**–प्रलय, अन्त.

आप भला तो जग भला । आप बुरा तो जग बुरा :— (विरुद्ध अर्थाच्या म्हणी यांचा अर्थ स्पष्ट आहे.)

आ पड़ोसिन मुझसी हो :—दुसरा आपल्यासारखा कसा होअील अशी अिच्छा. **कोढ़ी भये सङ्गाती चाहे । अपने जैसे करना या चाहना । पड़ोसिन**–शेजारीण. **कोढ़ी**–कोड फुटलेला.

आप लिखे खुदा बांचे :—आपलें लिहिलेलें आपणांस वाचतां न येणें. चिडमिड लिहिणें. **अस्पष्ट लिखना ।**

आप हारे बहूको मारे :—आपला राग बायकोवर काढणें. वड्याचें तेल वांग्यावर. **अपना क्रोध (गुस्सा) दूसरोंपर निकालना. बहू**–बायको.

आपही अपनी कब्र खोदना :—आपल्या हातानें आपलें नुकसान करणें. स्वतःचे पायावर धोंडा पाडून घेणें. **अपने विनाशका प्रयत्न आपही करना । कब्र**–थडगें, गड्ढा.

आपही मियां मंगते द्वार खड़े दरवेश :—आपण भिकारी तो दुसऱ्यास

साहाय्य काय करणार? अेकादशीचे घरीं शिवरात्र. **मदद चाहनेवाला दूसरोंको क्या मदद देगा?**

आमके आम गुठलीके दाम :—अेका दगडांत दोन पक्षी मारणें. सणांत सण नि भागुबाअीला खण. **अेक पंथ और दो काज; दुगुना लाभ अुठाना। दोहरा लाभ अुठाना।**

आप मियाँ सुबेदार, घरमें बीबी झोंके भाड़ :—अेका कानीं पगडी घरीं रांड अुघडी. **झूठी अैंठ दिखाना। बाहरसे बडे दिखाअी देनेपरभी घरमें दरिद्रावस्था होना॥**

आम खानेसे काम; पेड़ गिननेसे क्या काम :—अुष्टीं काढ, म्हणें जेवले किती? **अपने मतलबकी बातें करना। निरर्थक प्रश्न करनेसे क्या प्रयोजन होता है?**

आम फले पत राखके; मह्व फले पत खोय :—काम करणें तें स्वत:ची प्रतिष्ठा राखून करणें. **सज्जन लोग अिज़्जत संभालकर काम करते हैं।**

टीप :—आंबा व मह्‌ यांची योग्यायोग्यता दाखविली आहे. आंबा सर्वांस हवा, मह्‌ मद्यार्कामुळें त्याज्य.

आमोंकी कमाअी नींबूमें गवाँअी :—अेकांत झालेला फायदा दुसऱ्यांत तोटा घालणें. **अेक धंदेकी आमदानी दूसरेमें खर्च करना।**

आया नोश नहीं फ़रामोश :—असेल तेव्हां दिवाळी नसेल तेव्हां शिमगा. असेल तेव्हां चैन नसेल तेव्हां दैन. **आया तो खा लिया नहीं तो बैठे रहे। नोश**–पिणें, चैन. **फरामोश**–अुपवास, रोजा.

आयी गयी पार पड़ी :—झालें तें घडलें. पदरीं पडलें नि पवित्र झालें. **हो गया सो हो चुका।**

आयी बह्व आया काम; गअी बह्व गया काम :—आली सून आलें काम, गेली सून गेलें काम. सुनेकरितां कांहीं ना कांहीं काम काढलें जातें. ती गेल्यावर काम कमी पडतें असा हा अर्थ. **आदमीके आनेसे काम बढ़ता है और जानेसे कम होता है। मनुष्यके साथ काम भी बढ़ता है या घटता है।**

आयेकी खुशी न गये का ग़म :—आल्याचें सुख न गेल्याचें दुःख. संतुष्ट मनुष्यका लक्षण ।

आये थे हरीभजनको, ओटन लगे कपास :—गेले बसायला नि बसले दळायला. देव करायला गेलें नि काम गळ्यांत पडलें. अेक कामके लिअे आना और दूसरा काम गलेमें पड़जाना । कपास ओटना–कापसांतील सरकी काढणें.

आलसी गिरा कुंएँमें; कहा यहीं चैन :—आळशी मनुष्य नरकांत खुष. बुरा आदमी बुरी हालतमें भी संतुष्ट रहता है । आलसी–आळसी. कुआँ–आड, विहीर.

आसपास बरसे, दिल्ली विचारी तरसे :—जेथें हवें तेथें नाहीं, नको तेथें आहे. जहाँ गरज वहाँ न होना ।

आसमान ने डाला, धरती ने झेला :—बेवारशी स्थिति असणें. अनाथ-पोरका. आगा न पीछा अैसी हालत होना । आस्मान–आकाश.

आसमानका थूंका मुँहपर गिरता है :—आकाशाकडे थुंकलें तर आपलें तोंडावरच थुंक पडते. दुसऱ्याची निंदा करतांना आपली हानि होणें.

आस्तीनका सांप :—गुप्त शत्रु; अस्तनींतला निखारा. छिपा हुआ दुष्मन् ।

आहारे व्यवहारे, लज्जा नकारे :—खाणें, नि कामधंदा यांची लाज करूं नये. खाना, पीना, लेना, देना, अिन बातोंमें संकोच न करना ।

(अि)

अिक नागिन और पंख लगाअी :—आधींच मर्कट तशांतही मद्य प्याला. भयानक वस्तूका अधिक भयंकर स्वरूप । नागिन–सपक्ष सर्प.

अिक़रारे जुर्म, अिसलाहे जुर्म :—अपराध कबुली अर्धी दोष खाली.

अित्तिफ़ाकमें कुव्वत है :—अैक्यानें राहण्यांत बळ आहे. अेकीत बळ आहे. अेकतामें, अैक्य में बड़ी शक्ति है । अित्तिफ़ाक–अेकोप्यानें राहणें. कुव्वत–बळ.

अिन्द्रका बरसा, माँका परसा :—पाऊस (वर्षाव) व आअीचे हातचें जेवण पूर्ण तृप्ति देतात. बारिशका होना और माँके हाथसे भोजन करना तृप्ति देता है ।

अिधर गिरूं तो कुआँ, अुधर गिरूं तो खाअी :—अिकडे आड तिकडे विहीर. आअी जेवूं घालीना, बाप भीक मागूं देईना. दोहींकडचा प्रयत्न करण्यांत स्वतःची हानि होते.

अिधरके रहे न अुधरके रहे, न खुदाही मिला न विसाले सनम :—अिकडे न तिकडे दोहींकडे वांकडें. अितो भ्रष्ट स्ततो भ्रष्टः। **सब ओरसे मुसीबत पड़ना।**

अिधर न अुधर यह बला किधर :—कुणाच्या भानगडींत नसतां संकट गुजरणें. **अनपेक्षित विपत्तिका आना।**

अिस कान सुनी अुस कान अुड़ायी :—नळी फुंकिली सोनारे, अिकडून तिकडे गेलें वारे. अैकिलें नि सोडून दिलें. **कोअी भी बात ध्यानमें न रखना।**

अिस हाथ दे अुस हाथ ले :—ह्या हातानें करावें त्या हातानें भरावें. या हातचा झाडा त्या हाताला. **अिस हाथ लेना अुस हाथ देना। कर्मकी तत्काल फलप्राप्ति होना।**

(अी)

अीदके चांद हो गये :—दर्शन दुर्मिळ झालें. **बहुत कम दिखाअी देना।** अुंबराचे फूल.

अीमान है तो जहान है :—जग विश्वासावर चालतें.

अीश्वरकी माया, कहीं धूप कहीं छाया :—अीश्वराची करणी नि नारळांत पाणी. सुख नि दुःख ही जोडी आहे. **जगतमें कहीं दुख और कहीं सुख होता है।**

(अु)

अुखलीमें सर दिया तो चोटोंसे क्या डर :—मेलेलें मेंढरूं आगीला भीत नाहीं. न जाअी हार, जरी विपत्तींचा मार. **कार्यारंभ होनेपर विपत्तियोंकी क्या चिन्ता ?**

अुंगली पकड़ते पहुँचा पकड़ना :—थोडासा आधार मिळतांच गळीं

पडणें. भटाला दिली ओसरी, भट पाय पसरी. **थोडासा सहारा मिलतेही गले पड़ना। चंचू प्रवेशात् मुसलप्रवेशः।**

अुगले तो अंधा, निगले तो कोढ़ी :—अिकडे आड तिकडे विहीर. **दोनों बाज़ूसे विपत्ति।**

अूँचेसे अूँचा मिला, मिला नीचसे नीच। पानीसे पानी मिला, मिला कीचसे कीच :—समसमांचा संयोग होणें. सारखें मिळणें. **अेकसी प्रकृतिवालोंकी संगति होना। जैसे को वैसा मिलना।**

अुठती जवानी, पापकी निशानी :—तारुण्य हें पापाचें मूळ. गद्धे पंचविशी. **तारुण्यावस्थामें नीच होनेका संभव।**

अुठते लात, बैठते घूंसा :—अुठतां लाथ बसतां बुक्का. **हरेक बातपर मारपीट करना। हमेशा पीटना।**

अुठाऊ चूल्हा :—फिरतें बिऱ्हाड. चुळचुळ मुंगळा. **बेपता आदमी। भटकनेवाला। अस्थिर आसनवाला।**

अुठाअूका माल बटाअुमें जाय :—अपापाचा माल गपापा. चोरीचा माल मोरींत. **मुफ़्तकी चीज लुट जाती है।**

अुठी पेठ आठवे दिन लगती है :—सुसंधी कधीं दवडूं नये. बाजार आठवे दिवशीं भरतो. **मौका कभी नहीं छोड़ना चाहिअे।**

अुड़ती चिड़िया परखते हैं :—अुडत्या पक्षाची पारख करणें. **बहुत होशियार है।**

अुतरगअी लोअी तो क्या करेगा कोअी :—बिन अब्रूचा मनुष्य नंगा असतो. **नंगेसे खुदा डरता है।**

अुतरा घाटी हुवा माटी :—(१) घशाखालीं अुतरलेल्या पदार्थाची अेकच गति. (२) अुंचावरून पडला मातीमोल झाला.

अुतते अन्धा आवहै, अितते अन्धा जाय। अन्धेसे अन्धा मिला कोन बताये राय :—काम करणारा व करविणारा दोघेहि अडाणी अशी स्थिति. **करने और करानेवाला अनाडी होना अैसी हालत।**

अुतावला सो बावला—धीरसो गंभीर :—अुतावळेपणा हानिकारक. धीर धरणें फायद्याचें. मराठींत हीच म्हण रूढ आहे.

अुधार दिया गाहक खोया :—अुधार दिलें ग्राहक गेलें. अधार आणि

अंधार. अुधार मोल देना लड़ाअी मोल लेना. अुधार देणें नि भांडण अंगावर घेणें. अुधार देनेमें हानि है। अुधार और अंधेर।

अुलटा चोर कोतवाल को डाँटे :—चोरी करुन शिरजोरी करणें. चोराच्या अुलटया बोंबा. अपराध करके डांटकर बातें करना। दोषी मनुष्य निर्दोषपर दोष लगावे।

अुलटा चोर वैकुंठे जाय :—चोराची प्रतिष्ठा होणें. सांपडला तर चोर नाहीं तर बादशाहाहून थोर. दोषी व्यक्ति की प्रतिष्ठा होना.

अुलटी खोपडी अन्धा ज्ञान :—सांगावें अेक आणि समजावें दुसरेंच. असंगाशीं संग नि प्राणाशीं गांठ. कहा जाय कुछ और समझा जाय कुछ।

अुलटी गंगा पहाड़ को चली [पहाड़ो चढ़ी] :— अशक्य गोष्ट घडणें. नियम विरुद्ध काम होना।

अुलटी अँतडी गले में आयी :—करायला गेलें नि गळयांत आलें. अच्छा करने गये आफ़तमें पडे।

अुलटे बांस बरेली :—काशीस भागीरथी नेणें. अुल्टा काम करना. भरे पर भरना टीप—बरेली येथें बांबूचीं जंगलें फार आहेत. किंवा कोंकणांत नारळ नेणें अशा अर्थी.

अुसीकी टाँगें अुसी की गलेमें। अुसी की जूती अुसी के सिर :— त्याच्या तंगडया त्याच्याच गळयांत. अपनेही कृतिसे अपना नुकसान होना। विरुद्ध अर्थकी कहावत।

अुस के पौ बारह हैं :—त्याच्या घरीं आनंदी आनंद आहे. अुसकी हालत अच्छी है।

अुस की तूती बोल रही है :—त्याची खूप प्रतिष्ठा होत आहे. अुसका बड़ेजाव हो रहा है। अुसके नामको चार चौद लगे है।

(अू)

अूखसे गंडेरी प्यारी गुड़से (सबसे) प्यारी खांड :—अुपयुक्त वस्तु सर्वांस प्रिय असते. अच्छी चीज सबको प्रिय होती है।

ऊँची दूकान फीका पक्वान :—नांव मोठें लक्षण खोटें. मोठें घर पोकळ वासा; सफेत कपडे खिसा खाली—**दिखावटी काम होना।**

ऊँट किस करवट बैठेगा :—शेवट काय होओील सांगतां येत नाहीं. **न जाने क्या परिणाम हो। प्र. हिन्दी संमेलनका ऊँट किस करवट बैठे नहीं समझता।**

ऊँट जब भागे तब पच्छिम को :—गुरांचा ओढा घराकडे. **अपना घर सबको प्यारा होता है।**

ऊँट जबतक पहाड़ के नीचे नहीं आता तभीतक जानता है कि मुझसे ऊँचा कोऔी नहीं है। आपल्यापेक्षां अधिक ज्ञानी भेटल्याखेरीज आपली योग्यता कळत नसते. **किसीको अपनेसे अधिक ज्ञानी न समझना।**

ऊँट की चोरी ढूका ढूक :—(निहुरे निहुरे) मोठें काम छपून होत नसतें. **बड़े बड़े काम छीपकर नहीं होते।**

ऊँट के ऊँट ही रहे :—नर्मदेंतले गोटेच राहिले. **ज्योंके त्यों (अज्ञानी) रहे।**

ऊँट के गले में बिल्ली :—**विजोड बिवाह।** वृद्धबालिका विवाह.

ऊँट के मुँहमें जीरा :—डोंगरास दुखणें, शिपलींत औषध; **बकासुर को थोडा खाना।**

ऊँट को दगते देख मेंडकी ने भी टांग फैलाओी :—मोठ्याचें अनुकरण करणें वाओीट. बैल पाहून बेडकीनें पोट फुगवणें अशा अर्थी प्रयोग. **बड़ेका अनुकरण करना हानिकारक होता है।**

ऊँट चढ़के बूट मांगे :—वावदूक. अशक्य गोष्टी करण्याची ओीच्छा = बिनगरजेची वस्तु मागणें. **बिन गरजकी वस्तु मांगना।**

ऊँट बिलाओी लेग ओी, हांजी हांजी करना :—खुशामत करणें. बैल गाभणा तेरावा महिना.

ऊसर खेतमें केसर :—नापेर शेतांत पीक. भांगेंत तुळस. गारगोटीच्या पोटीं हिरा. **नालायक पिताके सुपुत्र जन्मना।** हिरण्यकश्यपूचे कुलांत प्रल्हाद.

(ऐ)

ऐक तरकश के तीर :—ऐकाच भात्यांतले बाण; ऐकाच माळेचे मणी. ऐक थैलीके चट्टे बट्टे।

ऐक आँखसे रोवे ऐक आँखसे हँसे :—फार कपटी व चलाख मनुष्य. ऐक डोळयांत हंसू दुसऱ्यांत आसू. धूर्त और चालाक आदमी।

ऐक अकेला दो ग्यारह :—
ऐक और ऐक ग्यारह होते हैं :— } ऐकीचें बळ अधिक. मिलकर शक्ति बढ़ाना। ऐकतामें बलाधिक्य है।

ऐक असामी सौ आर्जियां :—ऐका नोकरीकरितां शंभर अर्ज.

ऐक अनार सौ बीमार :—ऐक तीळ सात खाणारे. चीज ऐक लेनार बहुत। अनार-डाळिंब. बीमार-आजारी.

ऐक करे सब लाजे :—ऐक करतो सर्वांना बट्टा लावतो. ऐकके नीच कृत्यसे सब कुटुंब लज्जित होता है। ऐक करे दस भरे।

ऐक कहो न दस सुनो :—अरे म्हणूं नका, कारे ऐकूं नका. दगड टाकूं नका, चिखल अुडवून घेऊं नका. किसीको गाली न देना और किसी की गालियां न सुनना।

ऐक दूनेसे सौं के सवाये भले :—थोडचा नफ्यानें विक्री फार होते. थोडचांत गोडी फारांत लबाडी. थोड़ा नफ़ा लेना, भारी ब्याजसे मुद्दल डूबता है।

ऐक खाय दूध-मलीदा, ऐक खाय भूस :—जो तो आपल्या भाग्यानें खातो. कै भोज्य नानापरी। कै कोरडचा भाकरी. अपने अपने भाग्यसे मिलता है।

ऐक चुप हजारको हराये :—मौनं सर्वार्थ साधनम्। सबसे चुप भली। मौनी सदा विजयी होता है।

ऐकसे दो भले :—ऐकटचापेक्षां दुकटें बरें. ऐकसे दो अच्छे। ऐक का दिल दूसरेसे बहलाता है।

ऐक जान दो कालब :—दोन देह ऐक जीव. अत्यंत जिवलग मित्र. जीवश्चकंठश्च. ऐक जीव देह भिन्न। कालिब-देह, शरीर.

अेक तंदुरुस्ती हज़ार नियामत :—धनापेक्षां शरीरसंपत्ति श्रेष्ठ. तंदुरुस्ती (आरोग्य) सबसे श्रेष्ठ है।

अेक थैलीके चट्टे बट्टे :—अेकाच स्वभावाचे लोक. अेका माळेचे मणी. समान स्वभावके आदमी। अेक तरकश के तीर।

अेक दममें हज़ार दम :—अेक कमाऊ हजार फुकट खाऊ. अेक मिळविता हजार खाणारे. अेक मनुष्यसे हजारों मनुष्योंका निर्वाह चलता है।

अेक पंथ और दो काज :—अेका दगडानें दोन पक्षी मारणें. अेक कार्यमें दो कार्यका (दुगुणा) लाभ उठाना। अेक पत्थरसे दो परींदे।

अेक दिनका पावना दूसरे दिन अनखावना :—अेक दिवस पाहुणा, दुसरे दिवशीं लाजलावणा. मेहमान अेक दिनही अच्छा लगता है। अेक दिन मेहमान, दो दिन मेहमान, तीसरे दिन बला जान।

अेक कहे लोहैके चुक खोने, दूसरा बोले (कहे) लड़का ले गअी चील :—अेकानें अेक तर दुसऱ्यानें दुसरीच थाप मारुन कार्य साधणें. चील–घार. खोना–हरवणें. लोह–लोखंड.

अेक नूर कपड़ा दस नूर आदमी :—चांगल्या पोशाखानें मनुष्य प्रतिष्ठित दिसतो. अच्छा कपड़ा पहननेसे आदमी खुलता है।

अेक नारी सदा ब्रह्मचारी :—अेकपत्नीव्रत घेतलेला मनुष्य ब्रह्मचारी-समान असतो. अपने पत्निबिगर दूसरे स्त्रीका चेहरा न देखनेवाला।

अेक नीम सब घर शीतल :—अेक सुपुत्र सर्व घराचें नांव करतो. अेक चंद्रमा सब आकाश प्रकाशित करता है। अेक वीरपुत्र कुटुम्बकी कीर्ति बढ़ाता है। नीम–कडुनिंब.

अेक बोली तीन काम :—अनेक अवधानी असणें. अनेक कार्यमें अेक अुत्तर देनेसे तीन जबाबको निरुत्तर करना। सावधानी रखना।

अेक मच्छली सब जलको (सारे तालाबको) गदला (गंदा) करती (कर देती) है :—अेकाच्या खराबीमुळें कुटुंबाची बदनामी होणें. दुधांत मिठाचा खडा. अेक बुरा आदमी सबको बिगाड़ देता है। अेक पापी नाव लेकर डूबता है।

अेक म्यानमें दो तलवारें नहीं रहतीं :—दोघा सतेज मनुष्यांचें अेकत्र पटत नाहीं. अेक स्थानपर दो अधिकार चल नहीं सकते।

अेक मुँह दो बातें :—अेकाच तोंडानें दोन (विरुद्ध) गोष्टी सांगणें. सत्यासत्य भेद न मानना। अेकसे दूसरी विपरीत बात कहना।

अेक हाथ देना अेक हाथ लेना :—अेका हातानें देणें दुसऱ्या हातानें घेणें. दिलें दान परत घेणें. देअून न देअून सारखेंच. अिस हाथ देना अुस हाथ लेना।

अेकांत वासा, झगडा न सांसा :—ज्ञानी लोक अेकान्तवास पसंत करतात; कोणाच्या आद्यांत न मद्यांत. अेकान्त स्थानमें रहना निरामय होता है।

अेक साधे सब सधै सब साधै सब जाय :—अेक सिद्धि तर सर्व सिद्धि. मनुष्यानें अेकमार्गी असावें. नाहीं तर अेक धड ना भाराभर चिंध्या अशी स्थिति. कअी काम अेक साथ न करनेमें हानि होती है।

(अै)

अैब करनेके लिये भी हुन्नर चाहिये :—चोरीसुद्धां चतुराअीनें करावी लागते. दुष्ट कर्म करने को भी हुश्यारी लगती है।

अै मेरे करम जहाँ टटोलो वहीं नरम :—फुटक्या नशिबाचा. कपाळ करंटा. तखदीर को दोष देना। प्रारब्धहीन व्यक्ति।

अैसा काम हमेशा कर जिसमें न होवे कुछ भी ड़र :—विचारपूर्वक काम करणें. ड़र नहीं अैसा काम करना। निर्दोष कार्य करना।

अैसे जीनेसे मरना भला :—असें जगण्यापेक्षां मरणें बरें. दुखःमय जीवन होना।

अैसे सुहाग से रंडापा भला :—अशा सौभाग्यापेक्षां वैधव्य बरें. दुष्ट-पति होनेसे पतिहीन होना ठीक।

अैय्या रानी मैय्या रानी घरका पानी कौन आनी :—आअी राणी माअी राणी घरचें पाणी कोण आणी. सर्वच अैटखोर तेथें काम कोण करणार? सब अैबवाले होनेपर काम नहीं होता।

(ओ)

ओखलीमें सर दिया चोटोंसे क्या डर ? :—विपत्तियोंका डर न करना चाहिये । (ऊखलीमें अि. पहा)

ओछा घड़ा छलके घना :—पहा. अधजल गगरी.

ओछा–नीच, हलकट, कमी.

ओछेकी प्रीती बालूकी भीती :—हलकटाची मैत्री क्षणभंगूर. नीच मनुष्यकी मित्रता अस्थिर होती है।

ओछेसे खुदा काम न डालो :—हलकटाशीं संगत न घडो.

ओछेके संग बैठके अपनी हूँ पत जाय :—हलकटाशीं मैत्री आपल्या अब्रूचा नाश. संगती संग दोषेण सती च मतिविभ्रमः । अेकरात्र प्रसंगेन काष्ठघंटा विटम्बना । हीन व्यक्ति के संगतसे अपनी प्रतिष्ठा जाती है ।

ओछेके मुँह लगना अपनी अिज्ज़त खोना :—नीच मनुष्याच्या तोंडास तोंड देणें वाअीट. नीच आदमीके साथ झगड़ा करनेसे प्रतिष्ठा नष्ट होती है ।

ओट ओझल पहाड़ ओझल :—दृष्टि आड सृष्टि. ओट–काडी, तिनका. ओझल–अदृश्य.

ओढ़नी की बतास लगी :—वाअीलवेडा होणें. जोरूका गुलाम होना।

ओस के चाटे प्यास नहीं बूझती :—दांत कोरून पोट भरत नसतें. चाटे–तुषार. बूझना–शमणें.

(औ)

औंधी खोपड़ी अुलटी बात :—दुष्टांचे विचार दुष्टच असतात. मूर्ख तर्कटी मनुष्य असतो. खोपडी–डोकें, कवटी.

औंधे घड़ेका पानी मूरखकी कहानी :—निष्फळ कार्य किंवा गोष्ट. पालथ्या घडयावर पाणी.

औंधे मुंह दूध पीते हैं :—अज्ञानी आहे. अभीतक बालक है ।

और की खुटाअी अपने आगे आअी :—दुसऱ्याला केलेल्या खडयांत आपणच पडणें. दुसरोंकी बुराअी करोगे तो आपही बुराअीमें फँसेंगे ।

औरकी भूख न जाने अपनी भूख आटा खाने :—केवळ स्वार्थी दृष्टीनें पाहणें. स्वार्थान्ध होना।

औरत का खसम मरद, मरदका खसम रोज़गार :—स्त्रीला नवरा व पुरुषाला रोजगार असावा. निकम्मा आदमी अच्छा नहीं।

औरतको नादारीमें जाँचे :—स्त्रीची पारख संकटांत होते. स्त्रीको परीक्षा विपत्तिमें होती है।

और (सब) बात खोटी सही दाल रोटी :—साधेपणा हितकारी.

औलाती का पानी मंगरेपर नहीं चढ़ता :—वळचणीचें पाणी छतावर (आढ्याला) चढत नसतें. असम्भव घटना नहीं हो सकती।

औसर (अवसर) चूकी डोमनी गावे आल पताल :—बैल गेला नि झोंपा केला. समय चूकनेपर औरकी और बातें करना।

(क)

ककड़ी के चोरको फांसी नहीं दी जाती :—लहान गुन्ह्याला साधी शिक्षा. ककड़ीके चोरको कटारीसे नहीं मारते। छोटा गुनाह छोटी सजा। बड़ा गुनाह, कड़ी सज़ा

कंगालीमें आटा गीला :—दुष्काळांत तेरावा महिना.

कचौड़ी की बू अभीतक नहीं गयी :—मोठेपणा प्राप्त झाला तरी नीचपणा सुटला नाहीं. वैभवशाली होनेपर भी नीचता नहीं गयी।

कज़ा के आगे हकीम अहमक :—मरणापुढें वैद्य हात टेकतो. मृत्युके सामने वैद्य हतबल होता है। कज़ा–मरण.

कडुअेसे मिलिअे मीठेसे डरीये :—गोडबोल्यापासून सावध राहावें. कटु वचन पथ्यकर मधु वचन हानिकर. हांजी हांजी करनेवालों से सचेतन रहना।

कढीका सा अुबाल :—कढीला अूत, फुकट राग. गुस्सा आना और शीघ्रही जाना। बासी कढीमें अुबाल–शिळया कढीला अूत. बुढापेमें युवावस्था की चेष्टा करना या अुमंग आना।

कंटकेनैव कंटकम् :—शठं प्रति शाठ्यम्। कांट्यानें कांटा काढणें.

क़द्र खो देता है हरबारका आना जाना :—अतिपरिचय खोटा. बार बार जानेसे प्रतिष्ठा नहीं रहती ।

कनौड़ी बिल्ली चूहोंसे कान कटाती है :—अधिकारी भण्डा नि नोकरांचा कांढा. स्वदोषके कारण अधिकारी को भी अपने नौकरोंसे दबना पड़ता है ।

कपट की प्रीति मरन की भाँति :—कपटी मित्र नाशास कारण. कपटीसे मित्रता नहीं करना ।

कपड़े फटे गरीबी आयी :—फाटके कपडे गरिबीचें लक्षण. फटा कपड़ा दारिद्र्य दिखलाता है ।

कपूत बेटा मरा भला :—कुसंतानापेक्षां निसंतान बरें. कुपुत्रसे बिना-संतान रहनाही अच्छा ।

कफन सिरपर बांधे फिरता है:—मरणाला न भिणारा. हातावर शिर घेतलेला. मरनेका डर नहीं । मरने को तैयार । बेडर आदमी ।

कब दादा (बाबा) मरेंगे, कब बैल बटेंगे :—वरिष्ठ मरून बढतीची आशा करणें. बाबा मरतील नि वाटे होतील. बहुत समय तक प्रतीक्षा करते रहना ।

कबहूं भेक न जानही, अमल कमल की बास :—वाईट मनुष्यास सद्गुण दिसत नाहींत. सुंदर कमळाचा रसगंध बेडकाला काय होय?

कबूतरकी सोवर (कबूतरका सूतका) :—समाप्त न होणारें काम. मारुतीचें शेंपूट; प्रदीर्घ कार्य. जल्दी समाप्त न होनेवाला कार्य ।

कभीके दिन बड़े कभी की रात बड़ी :—नेहमीं अेकच स्थिति नसतें. दिन व रात सुखदुःखनिदर्शक आहेत. परिस्थितीमें बदल होताही है ।

कभी घी घना, कभी मुट्ठीभर चना, कभी वह भी मना :—कधीं सुग्रास भोजन, कधीं फुटाणें, कधीं तेंही नाहीं. जो कुछ मिले अुसीपर संतुष्ट रहना । कहीं भोज्य नानापरी कहीं कोरड्या भाकरी.

कभी नाव गाड़ीपर कभी गाड़ी नावपर :—अेकमेकाची अेकमेकास गरज असणें. नावेवर गाडा व गाडीवर नाव. सभीको दूसरेकी सहायताकी जरूरी होती है ।

कम खर्च बालानशीन :—काटकसरीनें मनुष्य श्रीमंत होतो. जिसका खर्च कम वह धनवान् होता है। बालानशीन—उच्चस्थानापन्न, थोर.

कम खाना, ग़म खाना, और किनारे चलना :—मिताहार, माघार घेणें व जपून चालणें श्रेयस्कर आहे. कम खाना, ग़म खाना और सँभालकर रहना अच्छा होता है।

कमाऊ पूत किस को अच्छा नहीं लगता :—दुभत्या गाओीच्या लाथा गोड. कमेरा लड़का (पूत) सबको प्रिय होता है।

कमानसे निकला तीर और मुँहसे निकली बात वापिस नहीं आती :—कोणतीही गोष्ट समंजसपणें करावी. छूटा तीर टूटा सिर। सोच समझकर बात करना।

कमज़ोर मार खानेकी निशानी :—कमजोरपणा हा घातुक असतो. अशक्त और निर्बल होना दुर्भाग्य है।

कमज़ोर गुस्सा जियादह :—दुर्बल मनुष्याला चटकन् राग येतो. अशक्तो दुर्जनः कुऱ्हा। दुर्बल आदमी जल्दी क्रोधाविष्ट होता है। गुस्सा–राग. जियादह–फार.

कमरमें तोसा बड़ा भरोसा :—गाठीं पैसा पुरा भरंवसा. कमरेस कसा अि०. अपने पास धन होनेसे विश्वास रहता है।

करता अुस्ताद न करता शागिर्द :—काम करणारा गुरु व बिगर कामी शिष्य. काम करनेवाला गुरु और न करनेवाला चेला।

कर तो डर न कर तो (खुदाके ग़ज़बसे) डर :—वाओीट काम करणारा भीत असतो; न करणाराही ओीश्वरी कोपास भितो. जगाशीं भिऊन वागावें.

करना है तो आज कर, कल कल ना कर :—आजचें काम अुद्यांवर टाकूं नये. तुरुत दान महापुण्य. शुभ कार्य जल्दी करना।

करनी करे तो क्यों डरे, करके क्या पछिताय :—कुकर्माचा परिणाम भोगलाच पाहिजे. बुरे कर्म का फल भोगना प्राप्त है। पछताना न चाहिये।

करनी ख़ाककी, बात लाखकी :—कृतिशून्य गप्पा भारी. बड़ी डींग मारना परन्तु कार्य कुछभी न होना। ख़ाक–शून्य, अल्प.

करम रेख ना मिटै करो कोअी लाखो चतुराअी :—प्रारब्ध-भोग भोगावेच लागतात. **कर्मभोग भोगनाही पड़ता है। रेख–लेख.**

करमहीन खेती करै बरध (बैल) मरे, कै सूखा परै :—कर्म-हीनाला यश नाहीं. कर्मकरंटी हातीं नरोटी. **दुर्दैवी कोअी कर्म नहीं कर सकता।**

कहना आसान करना मुश्किल :—सांगणें सोपें करणें कठिण. अुचलली जीभ लावली टाळूला. **प्रतिज्ञा सुलभ क्रिया कठिण।**

कहीं डुबे भी तरे हैं? :—बुडाले ते बुडालेच. **बिगड़ा हुवा काम सुधारता नहीं। डूबा सो डूबाच।**

कर ले सो काम भज ले सो राम :—कराल तें काम भजाल तो देव. **कार्य करनेमें आलस्य न करना चाहिये।**

करेगा सेवा पावेगा मेवा :—सेवेचें फळ मिळतें. राखील तो चाखील. **सेवा सुफलदायी होती है। कर सेवा पा मेवा।**

करिये मनकी सुनिये सबकी :—अैकावें जनाचें करावें मनाचें. **सबका सुनना, दिलका करना।**

करेगा सो भरेगा :—करील तो भरील. **बाप करेगा बाप भरेगा, बेटा करेगा बेटा भरेगा।**

करे कल्लू भरे लल्लू :—गोम्या करी सोम्या भरी. **अेक करता है और दूसरा कष्ट पाता है।**

कर्ज़दार छातीपर सवार :—सावकार कर्जदाराचे छातीवर उभा असतो. रोहिल्याचें कर्ज मरणाची निशाणी. **सावकारका तक़ाज़ा बुरा।**

कर्मप्रधान विश्वकरी राखा :—कर्माप्रमाणें शांति होते. अखिल विश्व-कर्मांनीं चालत आहे. **जगतमें सब अपने कर्मका फल भोगते है।**

कहा कुम्भज, कहां सिंधु अपारा :—वामन मूर्ति दिगंत कीर्ति. **तेजस्वी व्यक्ति छोटे होनेपर भी बड़ा कार्य करता है। कुम्भज**–अगस्ति ऋषि.

कहां राजा भोज कहां गंगू तेली :—कोठें इंद्राचा अैरावत व कोठें श्यामभटाची तटाणी! मोठ्याशीं लहानाची स्पर्धा. **असमान बातें होना।**

कहीं नाखून भी गोश्तसे जुदा हुअे हैं :—जीवश्च कंठश्च मैत्री. **दृढ**

मित्रतामें बिगाड़ नहीं हो सकता। मांस नि नखें कधीं वेगळें होतील काय? नाखून–नखें. गोश्त–मांस.

कहूं तो मा मारी जाय, न कहूं तो बाप कुत्ता खाय :—अिकडे आड तिकडे विहीर, आओी जेवूं घालीना बाप भीक मागूं देअीना.

कहेसे कुम्हार गधे नहीं चढ़ता :—हट्टी मनुष्याला सांगून काम होत नसतें. लकडीशिवाय मकडी वळत नाहीं. केवल कहनेसे मूर्ख काम नहीं करता। मूर्ख को तमाचा।

कांख में लड़का शहरमें टेर :—कडेवर मूल गांवांत दवंडी. पासके चीजका खोज करना। कांखेंत कळसा नि गांवांत वळसा. गोदमें. पाहा.

काग़ज़की नांव नहीं चलती :—खोटें टिकत नसतें. दगाबाजी से काम नहीं चलता। कमज़ोर वस्तु नष्ट होती है।

कागारौल करना :—अेकत्र होअून आरडा ओरड करणें. अिकट्टे होकर शोरगुल मचाना।

कांचे रंग जो धूपमें झटका मटका अुड़ि जात :—खोटें चौकशीअंतीं टिकत नाहीं. असत्य जांचनेपर नहीं ठहरता।

क़ाज़ीका प्यादा भी घुड़सवार :—न्यायमंदिरांत शिपायांची दंडेली. न्यायालयमें चपरासी शिरजोर।

पास अेक कौड़ी नहीं, दौलत खां है नाम :—नांव लखपति, भिक्षा पात्र हातीं. गाढवाचें नांव गोपाळशेट. **लखपती के पास कौडी भी न होना। गुण विरहित नाम।**

पास कौड़ी न बाज़ार देखा :—जवळ नाहीं कवडी, बाजारांत घेअी अुडी. **निर्धनका बडी डींग मारना।**

पासा पड़े सो दाव, राजा करें सो न्याव :—फासा पडेल तो डाव व राजा करील तो न्याय. नशिबाचा डाव व सत्तेचा न्याय सहन करावा लागतो.

पिसनहरीका बेटा और केसरका टीका :—दळुबाअीचा मुलगा नि केशराचा टिळा. **दरिद्री होकर धनीका अनुकरण करना।**

पिये रुधिर पय ना पिये, लगे पयोधर जोंक :—जळू किंवा गोचीड केवळ रक्तच शोषून घेतो, दूध पीत नाहीं. मूर्ख दुर्गुणच घेतो. **नीच मनुष्य अवगुणही ग्रहण करता है। जोंक–गोचीड, जळू.**

पीठ पीछे कुछ भी हो :—पाठीमागें कांहीं घडो. पाठीला डोळे नसतात. **आप मरे पीछे डूब गओ दुनिया।**

पीठ पीछे बादशाहाकोभी बुरा कह देते हैं :—पाठीमागें राजालाही शिव्या देतात. **सज्जन को भी अुसके पीठ पीछे बुरा करते है।**

पीपलकी चौखट :—पिंडास न सोडणारा, पिच्छा पुरविणारी व्यक्ति. **पिण्ड न छोडनेवाला व्यक्ति।**

पी प्याला, मार भाला :—नशा करून युद्ध करणें; **नशा करके युद्ध करना।**

पीर बवर्ची भिश्ती खर :—बोजे अुचलणारा. पूज्य पानी भरनेवाला, रसोअी करनेवाला, अपढ़ ब्राह्मण को कहा जाता है।

पीरकी सगाअी मीरके यहां :—भल्यांचा संबंध भल्याशीं. समान शीलांचा संबंध. भोंसले जाधवांचा संबंध. पीर और अमीर की सगाअी संबंध होना। सगाअी–सोयरीक.

पुन्नकी जड़ सदा हरी :—धार्मिक मनुष्य सदा संतुष्ट असतो. पुण्याअीची मुळी सदा हिरवी. पुण्यवंत सदैव फला फूला रहता है।
पुन्नकी–पुण्यवंताची. जड़–मुळी. हरी–हिरवी.

पुन्न ही आड़े आता है :—पुण्य कामास येतें. पुण्यवान स्वयं रक्षित होता है। (आड़े आना–मध्यें येणें, कवच होणें,)

पुराना ठीकरा और कलअीकी भड़क :—बुढ्ढी घोडी लाल लगाम. म्हातारपणीं ढंग. बुढ़ापेमें सजावट करना।
पुराना ठीकरा–जुन्या भांड्याचे तुकडे.

पुराने चावलों में मजा आता है :—म्हातारी माणसें फार गुणी व धूर्त असतात. जुनें तें सोनें. जुना जमाना अच्छा।

पुरानों को झिड़की, नयोंको प्यार :—जुनें तें पुराणें, नवें तें सोनें. जुन्याला झिडकारी नव्यावर प्रेम करी. जुना जमाना बुरा नया तराना अच्छा मानना। पुराने नोकरोंपर दया करना चाहिये।

पूछते पूछते देहली चले जाते है :—क्रमाक्रमानें सिद्धि मिळते. तोंड जवळ असल्यावर दिल्लीस जातां येतें। पूछकर काम करनेसे फल प्राप्ती होती है।

पूत अपनो कहे सब प्यारो :—आपलें मूल आपणास प्यार. अपनी संततिको कौन बुरा कहेगा।

पूत करे, भरतार के आगे आवे :—मुलाची करणी नि पित्यास हानि. बेटा करे, पिता भोगे।

पूत के पाँव पालनेमें पहिचाने जाते हैं :—मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात. छोटी अवस्थामें ही बच्चे की बुद्धि मालूम हो जाती है।
होनहार बिरवानके. पहा.

पूतों रात दुलम्भनी :—पुत्र-प्राप्ति दुर्लभ असते. पुत्र संतति होना दुर्लभ है ।

पूरा तोल चाहे महँगा बेच :—कमी माप देणें पाप आहे. माप और पाप ।

पूरी पड़े तो सपूत कहावे :—घरचा कमीपणा घालविणारा तो सुपुत्र.

पूरीसे पूरी पड़े, तो सभी न पूरी खोयँ :—फाजील खर्च दिवाळें काढतो. गोड खाण्यानें भागतें, तर जग दररोज गोड़च खातें.

पूरे है वही मर्द, जो हरहाल में खुश है :—सुखदुःख समान मानणारा शूर होय. सुखःदुख को ओक समझनेवालाही मर्द होता है । आफ़तमें डरना भीरु का काम है । हाल–अवस्था.

पेट कुआँ, मुँह सुई :—लहान तोंड खाणें फार. वामन मूर्ति दिगंत कीर्ति । छोटी अवस्थामें ही बडी बडी बातें कहना ।

पेट के आगे ना है :—पोट भरतांच ना म्हणणें. मनुष्य पोटाच्या बाहेर खाणार नाहीं. पेट भरनेके बाद कौन खायेगा ?

पेट खाओ आंख लजाओ :—अन्नाचा मारला खालीं पाही. अन्नदाता का लिहाज़ करनाही पडता है ।

पेट चले मनबरतोंका :—कुपथ्यानें रोग वाढतात. कुपथ्यसे रोग बढते हैं । अर्थात् परहेज़से रहना उचित है ।

पेट जो चाहे सो करावे :—पोटाकरितां सारीं सोंगें करावीं लागतात. पोट नाहीं तें करावयास लावतें. उदरनिमित्तं कृतबहुवेषः । गरीबोंको निद्यकर्म कर के पेट भरना पड़ता है । पेट बड़ा चाण्डाल है ।

पेट पालना कुत्ता भी जानता है :—उदरभरण सर्वांना कळतें. पेट कौन नहीं भर सकता?

पेट पीठ ओक हो रहा है :—अत्यंत क्षुधित होणें. अत्यंत भूखा होना । कष्ट का काम करने का प्रसंग ।

पेट भर और पीठ लादा :—भरे पोट वाही मोट. क्षुधित (भूखा) आदमी मिहनत कर नहीं सकता ।

पेटभर खाना और नींदभर सोना :—पोटभर खाणें व भरपूर झोंपा घेणें. अठा भोज्या मठा निद्रा. सुखलोलुप और निद्राप्रिय व्यक्तिको कहते है ।

पेट भरेके गून :—पोट भरलें गुण फुटले. पेटभर जानेकें बाद भुनभुनाना शुरू होता है।

पेट भरेके खोटे चाले :—पोट भरल्यावर चाळें करणें. पेट भरनेके बाद बदमाशी शुरू होती है या सूझती है।

पेट भी खाली गोद भी खाली :—न गरोदर न मूलबाळ. पाठी पोटीं कांहीं नसणें. न है गर्भवती न है सन्तान।

पेटमें आँत न मुँहमें दाँत :—म्हातारपण आलें. बुढापा आगया।

पेटमें अेक मुँहमें अेक :—पोटांत अेक नि ओठांत अेक. गोगल गाय नि पोटांत पाय.

पेटमें घुसे तो भेद मिले :—पोटांत शिरल्यावर भेद कळतो. बिना भेद जाने कुछ नहीं समझ पड़ता। गुप्तचर बनकरही भेद पा सकता ह।

पेट है या कुठार :—पोट आहे कीं पेटारा. ढेरपोटचा व खादाड मनुष्याला लावतात. कुठार–कोठार. कोठा.

पेट है या बेअीमानकी कब्र :—खादाडाला अनुलक्षून. तोंड नाहीं तोवरा. पोट नाहीं पेटारा बहुत खानेवालों के कहा जाता है।

पेटू मरे पेटको नामी मरे नामको :—पोटार्थी मरे पोटासाठीं, भला मरे नांवासाठीं. भूखा पेट के लिये और इज्जतदार अपनी आबरूके कारण लाचार रहता है।

पेड़ काटके पल्लव सींचना :—झाड कापून पानें शिंपणें. व्यर्थ प्रयत्न करणें. वृथा प्रयत्न करना। जान बूझकर झूठा प्रयत्न करना। नीचेसे जड़ काटना० पहा.

पैदल और सवार का क्या साथ ? :—अेक पायीं अेक घोड्यावर हें जमणार कसें ? पायदळ व घोडेस्वारांची जोड काय ? भिन्न स्थितिमें मेल नहीं हो सकता।

पैदा हुआ नापैद के लिअे :—मरण सत्रीस आहे. जातस्यहि ध्रुवो मृत्युः। जनन मरण के लिअेही होता है।

पैरका जूता पैरमें :—पायांतली वहाण पायांत, ज्यानें त्यानें आपले योग्यतेनें रहावें. अपनी अपनी योग्यतासे रहना।

परमें जूता न सिरपर टोपी :—अति हाल. अपेष्टामय जीवन. वस्त्रहीन व्यक्ति. अत्यंत दरिद्री होना। दाने दाने को मुहताज़ होना।

पैसा (दाम) करे काम, बीबी करे सलाम :—द्रव्येण सर्वे वशाः। पैसा गांठ होनेसे सब काय सिद्ध होते है।

पैसा गाँठका, जोरू साथकी :—पदरीं असेल तें धन व लग्नाची बायको दोन्ही कामास येतात. यही दोनों अपने होते हैं।

पैसा न कौड़ी, बाजार को दौड़ी :—पदरीं न रुका, बाजारांत मारी धक्का; जवळ नाहीं कवडी, बाजारांत वेळ दवडी.

पोथा सो थोथा, पाठे सो साथे :—अध्ययन पठन केलेलेंच उपयोगी पडतें. मुखोद्गत विद्या काम आती है। विद्या कंठ होना अच्छा।

प्यासा कुँअेके पास जाता है, कुंआ प्यासेके पास नहीं जाता :—ज्याला गरज असेल तो जरूरीच्या वस्तूकडे जातो. भक्तानें देवाकडे गेले पाहिजे. जैसी गरज वैसी अरज।

प्राण जाहि पर वचन न जाहीं :—प्राण जाओील पण वचन मोडणार नाहीं. (सूर्यवंशी राजांचें ब्रीद.) सत्यवचनी होना।

प्रीतिका निबाहना खांड़ेकी धार है :—प्रीति शेवटपर्यंत टिकविणें कठिण काम आहे. प्रीतिपालन खड्गाच्या धारेप्रमाणें तीक्ष्ण असतें.

प्रेम में नेम कहां? :—प्रेम वेडें असतें त्यास नीति नियमपालन कळत नाहीं. प्रेम अन्धा होता है। प्रेम संयम में नीतिपालन नहीं होता।

(फ)

फ़कीर अपनी कमली में ही खुश :—साधु पुरुष संतुष्ट असतात. फ़कीर की गरज प्रायः कमती होती है।

फ़कीरकी जुबान किसने कीली है :—साधूंचीं वचनें कोणी बंद करूं शकत नाहीं. फ़कीर का सवाल कोओी बन्द नहीं कर सकता। कीलना-बद करणें; मंत्रमुग्ध करणें.

फ़कीरकी झोलीमें सब कुछ :—फकीराची झोळी कामधेनु होय. गुसाओीं अपनी झोली में से सब कुछ दे सकता है।

फ़कीरी शेरका बुरका है :—संत किंवा साधु समर्थ असतात. त्यांना

आत्मबल असते. मोंगल राज्यांत राजवाडे, किल्ले यांत कारस्थानी लोक वेशांतर करून जात असत. त्यांना बंदी नसे. बुरका–बुरखा.

फटा मन और फटा दूध फिर नहीं मिलता :—फाटलेलें–कलुषित मन व नासलेलें दूध पुन: चांगलें होत नसतें. अेकादे वस्तूवरचें मन अुडालें कीं अुडालेंच. **दो आदमियोंमें मनमुटाव होना अच्छा नहीं ।**

फटेमें पांव दफ्तरमें नांव :—कोणतीही गोष्ट भांडणापर्यंत गेली कि सरकार दरबार आलेंच. **झगड़ा हुआ कि अदालत आतीही है ।**

फ़तह और शिकस्त खुदाके हाथ है :—जयापजय अीश्वराधीन होय. **हारजीत अीश्वराधीन होती है । फ़तह–जय. शिकस्त–पराजय.**

फ़तह तो खुदा के हाथ है, मार मार तो किये जाओ :—फळ अीश्वराधीन हिंमत न सोडावी. **जो होना है सो होगा, हिंमत मत छोड़ो ।**

फावड़ा न कुदार, बड़ा खेत हमार :—बढाअी मारणें, **बिना साधन खेतीकी शेखी मारना । कुदार**–कुदळी.

फिर बचा मोची का मोची :—पाण्यांतून निघाला कोरडा शंख. आधीं होता वाघ्या, मग झाला पाग्या, मूळ स्वभाव जाअीना, त्याचा अेळकोट राहीना. **जैसे के तैसे रहना । मोची**–चांभार.

फिर मुड़ली बेल तले :—पुन: पुन: संकटांत पडणें. पुन: पुन: वळवलेली (मुरडलेली) वेल तळीं जातें. **फिर आफ़त में या जोखिम में पड़ना ।**

फिसल पड़े की हर गङ्गा :—चुकन बिघडलेलें काम जाणून बुजून बिघडल्याचा बहाणा करणें. **भूलसे बिगड़ा हुआ काम जान बूझकर बिगड़ा बताना ।**

फुअी फुअी तालाव भरता है :—थेंबें थेंबें तळें सांचे. **थोड़ेसे बहुत होता है ।**

फूक मसाला, अुठा चौपाला :—चटकन् काम करणें. हळद अुडवून अेळकोट करणें. **झटपट काम करना । चौपाला**–पालखी.

फूटी आँखका तारा :—पोरका मुलगा. **मातृहीन बच्चा ।**

फूफी मिस देना, भतीजे मिस लेना :—अेका बहाण्यानें देणें व दुसऱ्यानें घेणें. **देनेको अेक बहाना और लेनेको दूसरा । मिस**–मिष. **फूफी**–आत्या, आत.

फूल आये तो फल भी लगेंगे :—यथाकाल गोष्टी घडणारच. फुलामागें फळ. सब बातें यथाकाल होती है।

फूल की डाल नीचे को झुके :—फुलांच्या भारानें फांदी खालीं झुकते. गुणवान् नम्र असतात. गुणी सदैव विनयशील होते है। डाल–फांदी.

फूल सूंघकर रहते है :—अल्पाहार करणें. हवा खाऊन राहणें.

फूल न सही, पँखडी सही :—फूल ना फुलाची पाकळी. बहुतकी जगह थोडा ही सही। फूल नहीं फूल की पाती।

फूहड़ करे सिंगार भांग ऑटोंसे फोड़े :—मांगहृदयीं असतील तेच, नीच कामें करतात. वेडीचा शृंगार नि मणभर शेंदूर. गवारीण बसली शृंगाराला, वीट घेऔ भांग पाडी. फूहड–वेडी

फ़ौजकी अगाड़ी आंधीकी पिछाड़ी :—फौजेत पुढें व तुफानामागें राहणें कठीण असतें. दोनोंही धोकेके काम होते हैं। आँधी–तुफान.

(ब)

बक़रीकी जान गऔ, खानेवालेको स्वाद (मजा) न आया :— शेळी जाते जिवानिशीं, खाणारा म्हणें वातड. कोऔ किसी के लिऔ कष्ट करे और वह अुसका ओहसान न करे तब।

बकरीकासा मुँह हमेशा चलता ही रहना :—नेहमीं खात राहणें. शेळीसारखें चरत राहाणें. माकडासारखें खाणें. हमेशा खाना अच्छा नहीं होता।

बकरा मुटाय तब लकड़ी खाय :—भांडखोर नेहमीं मार खातो. अडली गाय फटके खाय. बोकडाला मार लांकडाचा. मुटाय–मोठा झाल्यावर.

बकरी करे घाससे यारी, तो चरने कहां जाय बेचारी ? :—शेळी घासाशीं मैत्री करील तर खाऔल काय? बकरी व लांडग्याचें प्रेम व्यर्थ. अुपभोग्य वस्तूकी प्रीति कैसे हो सकती है ?

बकरी के नसीबों छुरी :—बोकडाच्या नशीबीं सुरी. अजापुत्रो बलिं दद्यात्। अनाथको सब सताते हैं।

बखत पड़े बांका, गधेको कहना काका :—अडला नारायण गाढ़वाचे पाय धरी. **बुरे समयपर दुर्जनको शरण भी जाना पड़ता है।**

बग़ल में छुरी, मुंह में राम राम :—गळयांत माळा बगलेंत सुरी. **साधु कहलाकर दुष्ट कार्य करना।** वेषधारी रावण.

बग़लमें तोसा, किसका भरोसा :—रोकडा पैसा असल्यावर दुसऱ्याचा विश्वास कशाला? सोनें गहाण नि मामा जामीन.

बग़लमें मुँह डालो :—स्वतःकडे पहा. अंतर्मुख व्हा. **अपनी ओर देखो।**

बग़लमें सोटा, नाम गरीबदास :—नांव गरीबदास स्वभाव रागीट. हातीं पुरी बगलेंत सुरी. **नाम अच्छा काम बुरा।**

बग़लमें लड़का, शहरमें ढिंढोरा :—कमरेवर मूल, गांवांत दांडोरा. खाकेंत कळसा, गांवांत वळसा. (गोदमें लडका पहा.)

बगुला भगत :—बगळयासारखा ढोंगी. मटक साधु. **दूसरोंका नुकसान करनेके अभिप्रायसे प्रकटमें अच्छा रूप धारण करना।**

बगुला मारे पखना हाथ :—बगळा मारून हातीं पंख येणें. शिकार करून निष्फळ. डोंगर पोखरून अुंदीर काढणें. **बडीं शिकार करना और अुसका फल थोडा मिलना।**

बछियाके बाबा, पड़ियाके ताअू :—अतिशय मूर्ख. सपुच्छांचें आप्त. कालवडीचे बावा व गोऱ्हयाचे दादा. **बछिया**—वासरूं. **पडिया**—पाडी.

बजत बजत आख़िर नंदके द्वार आयेगी :—कुंभाराची सून शेवटीं अुकीरडयावर येणारच. (१) **व्यक्तीका देहस्वभाव नहीं छूटता। (२) अन्तमें बात खुल जायेगी।**

बजा कहे जिसे आलम, अुसे बजा समझो :—जग म्हणेल चांगलें तेंच चांगलें. **लोकमान्य व्यक्ति लोकप्रिय और आदरणीय होते हैं।**

बज़ाज़की गठरीपर झींगुर राजा :—दुसऱ्याचे वस्तूवर मालकीहक्क सांगणें. आयत्या बिळांत नागोबा. **बज़ाज**—वाणी. **झींगुर**—झुरळ.

बटियाकी राह बेनिबाह :—आडमार्गाचा प्रवास धोक्याचा. **कच्चे रास्तेका विश्वास न करना चाहिअे। पगडण्डीका विश्वास न करना चाहिअे। बटिया**—पायवाट, मार्ग. **बेहिनाह**—भरंवसा नसलेली.

बड़तलेका भूत :—पारावरचा मुंजा. वडाखालचें भूत. पाठीस लागलेला. वड पिंपळावरचा समंध. पिण्ड न छोडनेवाली व्यक्ति।

बड़ा जाने किया और बालक जाने दिया :—शहाणा काम पाहतो व लहान मूल प्रेम (खाऊं) पाहतें. मोठा पाही करणी, बाल जाणे गुडदाणी.

बड़ा निवाला खाअीअे, न बड़ा बोल बोलिअे :—आपण मोठें काम करावें, बढाअी फार मारूं नये. डींग मारनेसे काम करना अच्छा है। निवाला–ग्रास. घास.

बड़ी कमाअीपर नोंन बिकवा :—मोठें होऊन छोटें काम करणें. मोठ्या नांवावर हलकें काम करणें. मोठ्या नांवावर वाअीट विकणें.

बड़ी ननंद शैतान की छडी, जब देखो तब तीरछी खडी:— थोरली नणंद अुभी सदा वेताची छडी. ननंदका त्रास भारी होता है। शैतान की छड़ी–बोलभांड; तड़तडी. तीरछी–कुऱ्हेवाज.

बड़ी नाकवाले :—प्रतिष्ठित मनुष्य! दुढ्ढाचार्य (व्यंग्यदर्शक) बड़े अिज्ज़तदार।

बड़े नाँदके टूक :— काप गेलें भोकें राहिलीं. अुच्च कुलका दीन हीन बना हुआ व्यक्ति। नाँद–घमेलें, डोणी. टूक–तुकडे.

बड़ी फज्जर, चूल्हेपर नज़र :—पहांटेस चुलीवर दृष्टि. सबेरा होते ही खानेकी तैयारी देखना। फज्जर होते ही खाने की फिक्र करना।

बड़ी बहू बड़ा भाग, छोटी बहू छोटा भाग :—मोठीचें भाग्य मोठें, लहानीचें लहान. बडे व्यक्तिका बड़पन दिखाअी देता है और छोटेका हीनत्व दिखाअी पड़ता है। बहू–सून.

बड़ी भाभी माके थानक :—थोरली भावजय मातेसमान असते. बड़ी भौजाअी माताके समान होती है। अर्थात् वह आदरणीय होती है।

बड़ी मछली, छोटी मछलीको खा जाती है :—बलवान् गरीबाला लुबाडतात. जीवो जीवस्य जीवनम्। सबल निर्बलको दबाते हैं।

बड़े अन्नपूर्णा बने हैं :—मोठे दाते आले आहेत. कर्णाचे अवतार! दानी आदमीको कहा जाता है। व्यंगोक्तिसे भी कहा जाता है।

बड़े आदमीकी पीठ काली, गरीबका मुँह काला :—मोठयाची निंदा पाठीमागें, गरीबांची त्यांच्या तोंडावर. **बड़ोंकी निन्दा अुसकी पीठ पीछे और गरीब व्यक्तिकी अुसके मुँहपर होती है ।**

बड़े कढ़ाअीमें तले जाते हैं :—मोठयांचा अपमान होणें. हत्तीला अंकुशाचा मार. **प्रतिष्ठित व्यक्तिका अपमान होना ।**

बड़े की बात बड़े पहिचानें :—मोठयाचें मोठेपण मोठयांनाच माहीत. **प्रतिष्ठितही प्रतिष्ठितोंको जानते हैं ।**

बड़े घोड़े की बड़ी चाल :—मोठयाची चाल मोठी. सर्वस्व महतो महत् । मोठया लोकांचें सर्वच मोठें. **बड़ोंकी बात बड़ी होती है ।**

बड़े चोरका हिस्सा नहीं :—मोठयांस वांटा नाहीं कारण तेंच मालक. **बड़े आदमी चाहे सो ले सकते है या कर सकते है ।**

बड़े बरतनकी खुरचनभी बड़ी :—मोठया घरीं सदा सण. मोठें भांडें मोठा खर्च. **बड़े आदमीके यहाँ कुछना कुछ कार्य होताही रहता है ।**

बड़े बापके बड़े बेटे :—वडिलांच्या मोठेपणावर अुडया मारणें. **बापके बड़पनपर बेटे की डींग मारना ।**

बड़े बोलका सिर नीचा :—गर्वाचें घर खालीं. **गर्विष्ठको नीचा देखना पड़ता है । अूंचा बोल का सिर नीचा ।**

बड़े मियाँ सो बड़े मियाँ, छोटे मिया सुभान अल्लाह :—मोठे तें मोठें, छोटें त्याहून मोठें. **जब छोटा व्यक्ति बड़ेसे बढ़कर काम करे तब अैसा कहा जाता है ।**

बड़े शहरका बड़ाही चांद :—मोठया शहरीं मोठी चोरी ! **बड़े शहरोंमें प्राय: धूर्त ठग अधिक होते है । (व्यंगोक्ति)**

बड़ोंका बड़ाही भाग :—मोठयाचें भाग्य मोठें. सर्वस्य महतो महत् । **बड़ोंका भाग्य भी बड़ा होता है ।**

बड़ोंका बड़ाही मुँह :—मोठयाची मागणी (भूक) मोठी. **बडे कीं मांग ही असाधारण होती है । वे बड़ी चीज या धन ही मागते है ।**

बड़ोंकी बड़ी बात :—थोरांचे विचार थोर. मोठयांचें सर्व मोठें. **बड़ोंके विचार भी बड़े होते है ।**

बड़ोंके कहेका और आँवलेके खायेका पीछे स्वाद होता है :–थोरांच्या अुपदेशाचा परिणाम आणि आवळचाचा रसास्वाद मागून कळतो. वृद्ध आदमी के वचन अनुभव पूर्ण होनेसे प्रसंगपर हितकर होते हैं ।

बड़ोंसे रक्खे आस न जाय पास:––मोठ्याची आस धरी परी राहे दुरी. मोठ्याची मैत्री करावी पण दूर राहूं नये । बडों के पास मांगनेसे हित होता है ।

बत्तीस दांत में जीभ :—चहूंकडून शत्रूचा वेढा. चारो ओरसे आपत्तिमें फँसा हुआ ।

बद अच्छा बदनाम बुरा :––रोग बरा कलंक वाअीट. शरीर की व्याधि अच्छी परन्तु बद काम बुरा ।

बद घोड़े की मेख :—नाठाळ घोडचास पायबंद. दुराचारी हाकिम की लिअे कहा जाता है ।

बदनमें नहीं लत्ता पान खाय अलबत्ता :––ढोंगीपणानें बडेजाव करणें. अपने पास न होनेवाली चीज का आडबर करना ।

बद बदीसे न जाय तो नेक नेकी से भी न जाय:––दुष्ट जर दुष्टपणा सोडीत नाहींत तर सज्जन सज्जनपणाही सोडणार नाहींत.

बड़े रोअे बडाअीको छोटे रोअे पेटको :––मोठा रडे नांवासाठीं, गरीब रडे पोटासाठीं. अेक पुती रडे सातपुती रडे ।

बंदर घुड़की :—वानराची भीति दाखविणें. बागुलबोवा दाखविणें. घुड़की–दटावणी.

१ बन्दर के गलेमें हार. २ बन्दर के हाथ आअिना :–ना समझके पास अच्छी वस्तु होना ।

बदली की छांह क्या ? :—ढगाची छाया अस्थिर; क्षणभंगूर स्थिति. मेहकी छाया क्षणिक होती है ।

बदाअूँ के लाला :—बदाअूचे टवाळखोर. बदाअूके टव्वे । लाला–मूर्ख, अैट खोर, चैनी लोक, (आळंदीचे चोर अशा अर्थी) बदाअूँ हें गांव कानपूरपासून ९० मैलांवर आहे.

बधिया मरी तो मरी, आगरा तो देखा :—तोटा झाला पण अनुभव आला. हानिसे अनुभव अधिक प्रिय होता है । आगरा–आग्रा.

बघे पाप अपकीरत हारे :—दोन्हीकडून संकट येणें. अेकीकडे मारण्याचे पाप व अेकीकडे अपकीर्ति अशी स्थिति. **दोनों ओरसे मुसीबत होना ।**

बन आअी कुत्तेकी जो पालकी बैठे जाय :—हीनाचें नशीब खुललें तर तो पालखींत बसतो. **तक़दीर हो तो अमीरीभी मिलेगी ।**

बनमें मोर नाचा, किसने देखा :—अेकांन्तात दाखविलेले गुण कोणी पाहिले? **अंधेरेमें छिपे हुअे सद्‌गुण कौन जान सकता है ?**

बनि आये की बनि आअी है :—घडणाऱ्या गोष्टी घडतातच. ज्याला देव प्रसन्न त्याचें काम साधते. घडायचें असलें म्हणजे तें घडतेंच.

बनिक पुत्र जाने कहा, गढ़ लेवेकी बात :—ज्याचें काम तोच करूं जाणें. वैश्यपुत्र किल्ला सर करण्याची गोष्ट काय जाणें? जेनुं काम तेनुं थाय अशी गुजराथीत म्हण आहे.

बनिया मारे जान-ठग मारे अनजान :—ठग अनोळखी मनुष्यास ठार मारतो, तर वाणी ओळखीच्या मनुष्यासही मारतो. **ठग न पहिचानने वाले को मारते है । किंतु बनिया पहिचानवाले से भी रियायत नहीं करता।**

बनिया लिखे पढ़े करतार :—वाण्याचें लिहिणें भद्दड. (मोठें)

बनियेका मुँह ग्राह और पेट मोम :—(१) वाणी पोटाला चिमटा घेअून धन संचय करतो. (२) वाणी अंतरीं दयाशील, पण वरून दुष्ट असतो. **ग्राह**-मगर. **मोम**-मेण.

बनियेकी सलाम बे गरज नहीं होती :—वाण्याचा नमस्कार सहेतुक असतो. **बनियेका सलाम स्वार्थपूर्ण होता है।**

बनीके सब यार है } शितें तंवर तीं भुतें भोंवतीं
बने बने के सब कोअी साथी } **संपत्कालमें सब साथी होते हैं।**

बन्दर क्या जाने अदरकका स्वाद :—गाढवास गुळाची चव काय? ज्याला स्वतःची कदर तोच दुसऱ्याची कदर जाणतो. **अपनी क़दर बिना कोअी किसीका क़द्र नही जान सकता।** अदरक-आलें, सुंठ.

बंदरका हाल मुछंदर जानें :—मित्राचे हाल मित्रच जाणतो. चोराचीं पावलें चोरासच ठाअूक. **मित्र ही अपनी व्याधिको समझ सकता है।**

बंदा जोडे पली पली, लुकमान लुटावे कुप्पे :—तेली करी धार धार खुदा मारी अेकच बार. **कष्टसे संग्रहीत चीजका नाश होना ।**

बरसात में कड़ाही घरघर :—पावसाळ्यांत तळणें, भाजणें फार. **प्रायः अधिकांश त्यौहार बरसात में ही होते हैं ।**

बरसाती दरजी होना :—हातावर हात व पायावर पाय टाकन बसणें. **बेकार होना. । दरजी**–शिपी.

बराती किनारे हो जायेंगे । काम दुल्हा दुल्हीसेही पड़ेगा :—वऱ्हाडी (वराती) दूर हो ील व नवरा नवरीशींच काम पड़ेल. **लड़ाअी कराकर बहकाने वाले दूर हो जायेंगे । सिखानेवाले लडाअी कराके अलग हो जाते हैं ।**

बरु भल बास नरक कर ताता । दुष्ट संग जनि देय विधाता :—दुष्टाचे संगतीहून नरकवास बरा. वाअीट संगत दुःखदायी असते. **दुष्ट की संगति नरकवाससे भी बुरी होती है ।**

बरेली जानेकी गत करना :—वेडयाची गत होणें. ठाण्यास जाण्याची अिच्छा होणें. (व्यंगार्थानें) बरेली येथें वेडयाचें हॉस्पिटल व अुद्योगगृह आहे. **पागल होना । पागलो की माफ़िक काम करना ।**

बल तो अपना बल; नहीं तो जाय जल :—आपलें बळ आपणास अुपयोगी, दुसऱ्याचें बल फुकट. स्वतः करूं तें काम; दुसऱ्यावर विश्वसून काम होत नाही.

बलवान के बिस बिसे, मारे और रोने न दे :—अत्याचारी मारतो व रडूंही देत नाहीं. तोंड दाबून बुक्यांचा मार. **बलवान अत्याचार है और रोनेभी नहीं देता । बलवान की सब बातें माननी करता पड़ती है ।**

बसत ओशके सीस तअू, भयो न पूर्ण मयंक :—व्यक्तीमागें नशीब सावलीप्रमाणें जातें. चंद्र शंकराच्या डोक्यावर राहूनही अपूर्णच राहिला. पळसाला तीन पानें. **तअू**–तेव्हां. **मयक**–चंद्र. **सीस**–शीर्ष, मस्तक.

बात रह जाती है, वक़्त नहीं रहता :—वेळ निघून जाते बोल राहतो. **समय निकल जाता है बात रह जाती है ।**

बसन नीलके काठमें, कबहूं लाल न होय :—वाओीटांचे संगतींत कीर्ति होते. अप दुर्जनके संगतिसे दुष्परिणाम जरूरही होगा।

बस हो चुकी नमाज़, मुसल्ला अुठाअिये :—काम संपल्यावर निरोप देणें. सभा बरखास्त होने के समय कहते हैं। हो चुकी–संपली.

बसंत की ख़बर ही नहीं :—राजाला दिवाळी ठाअूक नाहीं. त्याला दररोज दिवाळी असते.

बहती गंगा में पांव धोलो
बहती गंगा में हाथ धोना } वाहत्या गंगेंत हात धुणें. तापल्या तव्या-वर पोळी भाजणें. थोड़ीसे प्रयासमें सफ़लता प्राप्त कर लेना।

बह मरे बैल, बैठे खाय तुरंग :—कोणी कष्ट करून मरतात, कोणी चैन करून मरतात. कुणी मरे कुणी चरे. तुरग–घोडे. बह–गाड्या ओढून, कष्ट करून.

बहिरा राग का स्वाद क्या जाने ? :—बहिऱ्यापुढें गायन व्यर्थ. गाढवाला गुळाची चव काय ? मूर्ख गुणकी कद्र नहीं जानता।

बहिरा बहिश्ती अंधा दोज़खी :—आंधळा लुच्चा व बहिरा सच्चा. काना कहिपती आंधळा हिकमती. कहिपति–टोळीचा नायक. बहिश्ती– स्वर्गांत राहणारा; स्वर्गीय. दोज़खी–पापी, नरकवासी.

बहिरा सुने धर्मकी गाथा :—बहिरा अैके धर्माचें पुराण. बहिऱ्यापुढें कहाणी. असंभाव्य घटना। असंभाव्य–न होनेवाली.

बहुत कथनी थोडी करनी :—फार सांगणी थोडी करणी. बड़ी डींग मारना परन्तु कार्य थोड़ाही होना।

बहुत गअी थोड़ी रही :—हत्ती गेला शेंपूट राहिलें. बुढ़ापा आनेपर कहा जाता है। अवशेष कार्य थोडाही रहा है।

बहुगुणी बहुदुःखी :—कार्यकुशल असूनही निर्धन असणें. रावा जों जों बोले तों तों पंजरीं पडे. बहुत कुशल होनेपरभी दाने दाने को तरसना।

बांझ क्या जाने प्रसूत की पीर (पीड़) :—वांझ काय जाणें प्रसुतीची वेदना. ज्याचें दुःख तोच जाणें. जिसने जो दुख नहीं अुठाया वह असकी तकलीफ़ नहीं जान सकता। जिसपर पड़ती है वही जानता है। पीर–पीड़–वेदना.

बांझ बियानी सौंड अुड़ानी :—कांट्याचा नायटा होणें. पराचा कावळा होणें. **बातका बतंगड होना। मामलेको बढ़ा देना।**
सौंड–पासोडी. **बांझ**–वांझ स्त्री. **बियानी**–प्रसवणें.

बांध खीसा ले हिसा :—थैली सोडील त्यास वांटा मिळेल. **जो दाम देगा वही हिस्सा पावेगा। विना कार्य के प्राप्ति नही होती.।**

बांधे सकेला, फिरे अकेला :—हत्यारबंद निर्भय असतो. **सकेला**–तरवार.

बाँसके बाँस खाये, अुतराअी की अुतराअी दी :—बावा गेले नि दशम्या गेल्या. **खर्च होकर भी अपमान होना।**

बाँसके बाँस मल्लाही की मल्लाही :—अेकच वस्तूचा दुहेरी अुपयोग. दुबार काम आना. मल्लाही–नावाड्याची अुंच काठी (शेकाटा),

बांह गहे की लाज :—ज्याशीं संबंध केला त्याचे जवळ राहिलें पाहिजे.

बात कहे की लाज :—सांगितलेल्या गोष्टीची (वचनाची पाळण्याबद्दल) लाज. **कही बात निभानी पड़ती है। कही हुअी बात को पूर्ण करना।**

बाघकी मौसी बिलाअी :—वाघाची मावशी मांजर. वाघाच्या सारखी त्याची मावशी. अेकाच जाति-स्वभावाचे.

बाजार किसका; जो लेके दे अुसका :—ज्याला कर्ज नाहीं त्याला सर्व अुधार देतात. **अच्छी नीयत वालों को बाजारमें माल मिलता है।**

बाजारकी छींक और सुसराल की गाली :—बाजारांत आलेली शिंक व सासरची शिवीगाळ इकडे दुर्लक्ष करावें.

बात कही और पराअी हुअी:—गौप्यस्फोट करतां कामा नये. षट्कर्णी झाली ती जगभर झाली. **गुप्त भेद प्रकट न करना चाहिये।**

बात गअी फिर हात न आती. :—
बात गये कुछ हाथ नहीं हैं :—
} पत गेली की गेली. हातची वस्तु गेली की गेली. गेली वेळ पुन्हा न येअी.

बात पर बात याद आती है :—ओंवी मागें ओंवी आठवते. गोष्टी-मागून गोष्ट आठवते. **प्रसंगानुसार स्मरण होता है।**

बातें आयें बातें जायें, बातों केवल रोटी खाय। बात चूकें लाते खाय :—खऱ्या खोटया गोष्टी सांगून पोट भरणें. **बात बतानेवाला पेट**

पालता है और समयपर निंद्य होता है। बातो सें पेट नहीं भरता।

बातकी करामात है :— गोष्टींनीं मोठमोठीं कामें होतात. **बातोंसे बड़े बड़े काम सफल होते हैं। बात कहनेमें भी चतुराअी होती है।**

बादल फटे तो कहां तक थेगली लगाअी जाय? :— फाटक्या आभाळाला ठिगळ किती द्याल? **चारों ओरसे बिगड़ा हुआ कार्य नहीं सुधारता।**

बान जल गया, पर बल न गया :— सुंभ जळालें परंतु पीळ जळाला नाहीं. दुराग्रह सुटला नाहीं. **बर्बाद हो गये, पर ज़िद न गअी।**

बान (आदत) पड़ी नहीं छूटती :— जडलेली संवय सुटत नाहीं. मनुष्य संवअीचा दास बनतो. **आदमी व्यसनाधीन होता है।**

बानवालोंकी बान न जाय; कुत्ता मूते टांग अुठाय :— वाअीट संवअीच्या माणसाची संवय सुटत नाहीं. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं. **बुरी आदत कभी नहीं छूटती।**

बाप कंटक, बेटा हातिम :— बाप चिक्कू, बेटा अुदार. बाप व मुलगा यांत जमीनअस्मानाचें अंतर. **बाप कञ्जस बेटा दाता।**

बाप करे बापके आगे आये; बेटा करे बेटेके आगे आये :— बाप करील बाप भोगील; पुत्र करील पुत्र भोगील. करील तो भरील. **करेगा सो भुगतेगा।**

बापका बेटा बनके सब आते हैं:—
बापका बाप बनकर कोअी नहीं आतां
} सर्व गोष्टी न्यायानें होतात. **सब बातें यथान्याय होती है।**

बापकी बरात बेटा जाय :— विसंगत गोष्ट; बापाच्या वरातीला मुलगा हजर. अपवाद—बापाचा द्वितीय संबंध होअील तर घडेल.

बाप तैसा बेटा, कुम्हार जैसा लोटा :— जसा बाप तसा मुलगा. कुंभाराचीं मडकीं अेकाच सांच्याचीं, अेकाच आव्यांतलीं.

बाप न मारी पीड़री (पोदनी), बेटा तीरंदाज :— लांब लांब गप्पा मारणें. **लंबी चौड़ी बातें करना। पोदनी—**शिकार.

बाप बता या पिंड पार :—
बाप दिखा या गोर बता:—
{ बाप दाखव नाहींतर श्राद्ध कर. पेंचांत पकडणें. **गोर—**कब्र, थडगें. **असल चीज़ लाना या अुसका पत्ता बतलाना।**

बाप भिकारी, पूत भण्डारी :—बाप भिकारी मुलगा भंडारी. **निर्धन पिताके धनवान पुत्र । भण्डारी**–कोठीवाला, खजीनदार.

बाप मरा घर बेटा भया, असका टोटा असमें गया :—अेका कामांत हानि व दुसऱ्यांत लाभ होणें. **अेक घटना हानिकारक होती है। और दुसरी फायदा देती है, तब अैसा कहा जाता है।**

बाप मारेकी दुश्मनी :—पिढीजात वैर. **जानी दुश्मनी हो तब असा कहा जाता है। प्र. अिंग्लैन्ड और जर्मन की बाप मारेकी दुश्मनी है।**

बाप पै पूत, सिपाही पै घोड़ा, बहुत नहा तो थोड़ा थोड़ा :— वडिलांचा मुलावर व स्वाराचा घोड्यावर थोडा तरी ताबा (दाब) असतो. **पिता का पुत्रपर, और स्वार का घोडेपर अधिकार होता है।**

बापसे बेटा सवाअी :—वडिलापेक्षां थोर कीर्ति असणारा मुलगा. **पुत्रकी अधिक कीर्ति होना। अेकसे दूसरा बढ़कर होना।**

बाबा आदमके वक्तकी चीज़ :—फार जुनी वस्तु, गोष्ट. **पुरानी चीजको कहा जाता है।**

बाबा आये न घण्टा बजा :—पाटील आल्याशिवाय कामास प्रारंभ नाहीं. पुजारीविना देवपूजा कुठली?

बाबाजीके बाबाजी, बाजन्त्रीके बाजन्त्री :—गाजराची पुंगी वाजली तर वाजली, नाहींतर मोडून खाल्ली. अेका कामांत दोन कामें साधणें.

बाबा सोवे या घरमें, टांग पसारे वा घरमें :—दोन कामें अेकाच वेळीं होत नाहींत. **अेकसाथ दो काम करना अनुचित है।**

बामन, कुत्ता, बानिया, जब देखें गुर्राय :—स्वजाती पाहून ब्राह्मण, वाणी व कुत्रा हे रागावतात. भिक्षुको भिक्षुकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गरायते अशा अर्थाची म्हण. भिकारी भिकाऱ्यावर राग करी.

बामन जीमें ही पतिपाय :—ब्राह्मण भोजन–प्रिय असतो म्हणून ढेंकर दिल्यावर ाह्मण संतुष्ट. **खानेसेही ब्राह्मण विश्वास करता है।**

बामन बचन प्रमाण :—ब्राह्मणाचें वचन खरें असतें म्हणून साधारणतः त्यावर विश्वास बसतो.

बामन भये तो क्या भये गले लपेटे सूत :—गळ्यांत जानवें घात

त्यानें ब्राह्मण होत नसतो. ब्राह्मणाला विहीत अशीं कर्में केलीं पाहिजेत. खाली जनेअु धारण करनेसे ब्राह्मण नहीं होता।

बारह बरस दिल्लीमें रहे भाड़ ही झोंका :—बारा वर्षें काशीस राहून कोरडे. अच्छे स्थानसे निवास करनेपर भी कुछ ज्ञान प्राप्त नहीं हुआ।

बारहमें तीन गये तो रही राख :—अेक पावसाळा फुकट गेला तर सारें वर्ष फुकट जाते.

बारीमें बारह आम, सट्टीमें अठराह आम :—जहाँ बारीमें चीज महेंगी मिलनी चाहिअे, वहाँ सस्ती मिलना। जब किसी वस्तुका मोल अितना कम लेते हैं जितनेपर वह वस्तु जहाँ पैदा होती है, वहाँ भी नहीं मिल सकती। सट्टी–अेकाच प्रकारच्या वस्तूंचा बाजार.

बारेकी मां और बुढ्ढेकी जोरू न मरे :—मुलाची आअी व वृद्धाची बायको मरूं नये. बच्चेकी मा और वृद्ध मनुष्यकी स्त्री मरनेसे अुनकी अवस्था असह्य हो जाती है।

बाल अुखाड़नेसे मुर्दा हलका नहीं होता :—क्षुल्लक गोष्टी केल्यानें बिकट काम शेवटास जात नाहीं. दांत कोरून पोट भरत नाहीं. किंचित् सहारा होनेसे बिकट कार्य पूरा नहीं हो सकता।

बालक जाने दिया, मानस जाने किया :—मुलावर प्रेम करून व मोठा मनुष्य कामानें संतुष्ट करता येतात. लहान मुलें प्रेम जाणतात व मोठा माणूस काम पाहतो. प्यार करनेसे बालक संतुष्ट होते हैं। काम करनेसे आदमी प्रसन्न होता है। दिया–दिलेलें, खाअू.

बालका कंबल करना :—सुताची साडी करणें. लोंकरीची घोंगडी विणणें क्षिरकोळ वस्तुपासून मोठीं वस्तु तयार करणें.

बालकी खाल निकालना :—असह्य टीका करणें. छिद्रान्वेषण. बेहद नुक़्ताचीनी करना। नुक़्ताचीनी–टीका. खाल–चामडी.

बालकी खाल, हिन्दीकी चिंदी :—अर्थाचा अनर्थ नि भागवताच्या चिंध्या. सूक्ष्म भेद काढणें. अर्थका अनर्थ करना।

बाल बांधा चोर :—अट्टल दरोडेखोर. डोळ्यांखेरीज सर्व चेहरा झांकलेला असा. चालाक डाकू या चोर को कहा जाता है।

बाल बांधी कौड़ी मारता है :—चांगली तिरंदाजी करणें. अट्टल नेम मारणारा. डोक्यावरचें लिंबू अुडविणारा.

बालूकी भीत, ओछेका संग, पतुरियाकी प्रीति और तितलीका रंग :—हे सर्व क्षणभगूर होत. बाळूची भिंत, नीचांची संगत, वेश्येचें प्रेम व फुलपांखरांचे रंग हे चंचल आहेत. **यह सब अस्थायी (चंचल) होते हैं।**

बावले कुत्तेनें काटा है :—पिसाळल्याप्रमाणें करणें. वेडेचार करणें. **पांगलीकी तरह बर्ताव करना।**

बावले गांव में ऊँट आया; लोगोंने जाना परमेश्वर आया :—मुर्खाला साधी गोष्ट देखील अजब वाटते. आगगाडीच्या पाया पडणारे मूर्ख. **मूर्खोंको मामुली घटना भी और होती है।**

वासनसे बासन खटकताही है :—तटा बखेडा होणें. भांड्यास भांडे लागतेंच. **अेक जगह दो बरतन आनेसे शब्द अवश्य होता है।**

बासी बचे न कुत्ता खाय :—शिळें अुरेना, कुत्रा खाअीना. टोमणा म्हणून प्रयोग किंवा मितव्ययाचें लक्षण. **अिसका प्रयोग व्यंग्यमें होता है।**

बिंध गये सो मोती, रह गये सो सीप :—पदरीं पडलें तें काम. विंधलें तें मोतीं राहिली ती शिंप. **हुवा सो काम रहा सो रहा।**

बिच्छूका काटा रोवे, सांपका काटा सोवे :—दुष्टांचा दंश वाअीट. विंचू चावलेला राहतो; सर्पदंशानें बेशुद्धी येते.

बिच्छूका मंत्र न जाने, सांपके पिटारेमें हाथ दे :—योग्यतेच्या बाहेर काम करणें. **अपनी योग्यतासे बाहरका कार्य करना।**

बिजली चमके, मेह बरसे :—वीज चमके पाअूस पडे. वीज कडाडे मेघ घडाडे. **बिजली चमकनेपर वर्षा होती है।**

बिन घरनी घर पादत है :—पत्नी घराची शोभा आहे. गृहिणी गृहमुच्यते। **स्त्री सेही घर सुशोभित रहता है। घरनी**—गृहिणी.

बिन पंखही चाहत अुड़ाना :—साधना खेरीज सिद्धि अिच्छिणें. **साधन के बिना कार्य हाथमें लेनेकी अिच्छा। असंभव बात करने की भावना।**

बिन परिचय परतीत नहीं :—परिचयानें प्रचीति येते. ओळखीनें ओळख वाढते व अनुभव येतो. **बिना सहवास विश्वास नहीं होता।**

बिन बोले गुण जान न जाय :--अबोल मनुष्याचे गुण कळत नाहींत. प्रसिद्धि पराङ्मुख राहून चालत नाहीं.
आदमीके बोल (वचन) जाननेपरही अुसका स्वभाव मालूम होता है।

बिन भय होत न प्रीत :--धाकावांचून खरें प्रेम (शुद्ध) राहात नाहीं. प्रेम के साथ भय होना अवश्यक है।

बिन मांगे मोती मिले, मांगे मिले न भीक :—न मागे तयाची, रमा होय दासी; फिरे मागता तो सदाही अुपाशी। मिलनेवाली चीज बिना मांगेही मिल जाती है, मांगनेसे भिक्षा भी नहीं मिलती।

बिना रोये तो मा भी दूध नहीं पिलाती :--कोणीही स्वखुषीनें कांहींही देत नाहीं. दार ठोठावल्याखेरीज अुघडत नाहीं. कोअी भी स्वयं खुशीसे कुछ नहीं देता। मांगनेपर ही मिलता है।

बिना असलके नकल नहीं होती :—अस्सल आहे तरच नक्कल. अस्सल वस्तु असल्याशिवाय नक्कल होत नाहीं. नकल है तो असलकी कीमत है। असलसे ही खिज़ाब होती है।

बिना सींगके बैल :—मूर्ख मनुष्य. पुच्छहीन पशु।

बिनौलेकी लूटमें बरछीका घाव :—किरकोळ गोष्टीकरितां फार कष्ट करणें. कोल्हयाचे शिकारीस वाघाचे शिकारीची तयारी.

बिल्लीका खेल चूहोंकी मौत :—मांजरीचा खेळ अुन्दराचें मरण. अेकाचा खेळ दुसऱ्याचें मरण. किसी अेकको दुख देकर दूसरेको सुख होना।

बिल्लीको ख्वाबमें चूहे :—दुष्टास सर्वत्र दुष्टपणा दिसतो. शिखानष्टास सर्वच शिखानष्ट. बुरे को बुराअीही दीखती है। ख्वाब–स्वप्न.

बिल्लीके गलेमें मोहन माला :--मुर्खाला सदुपदेश; कोंबड्याला रत्नें. मूर्खको अच्छी बातें सुनाना निरर्थक होता हैं।

बिल्लीके भागसे सींका टूटा :--शिक्याचें तुटलें बोक्याचें जुंपलें; भाग्यानें अेकाद्याचा फायदा होणें. भाग्यसे किसी अच्छी वस्तुका लाभ होना।

बिल्ली खायगी नहीं, पैर फैला [लुढकाय] तो देंगी :—तुला न मला घाल कुत्र्याला अशी स्थिति करून टाकणें. दुष्ट मनुष्य स्वयं लाभ न अुठाकर व्यर्थ की हानि कर देता है।

बिल्ली चुहां खुदाके वास्ते नहीं मारती :--जो तो आपला स्वार्थ साधीत असतो. **परोपकार भी स्वार्थ मूलकही होता है ।**

बिल्ली भी दबेपर धावा करती है :—प्रसगीं मांजरही मनुष्यावर चालून जातें. **दबनेपर बिल्ली भी हमला करती है ।**

बिसनी बिलार अुबरीमें डेरा :--अगांतुक पाहुण्याला ही म्हण लावतात. **विनाबुलायें मेहमानपर यह कहावत कही जाती है । बिल्ली खाने के वक्त बिना बुलाये वा बैठती है ।**

बिसमिल्लाह ग़लत :—प्रारंभालाच विघ्न. प्रथम ग्रासे मक्षिकापातः । मुसलमानांत कार्यारंभीं बिसमिल्लाह हें नांव अुच्चारितात. **शुरू होतेही विघ्नापत्ति आना । बिसमिल्लाह**–ओश्वर.

बिस्वा विषकी गांठ है :--स्थावर भांडणाचें मूळ आहे. **जमीन के वास्ते लड़ाओ होती है ।** बिस्वा–पांड (जमीनीचा विसावा भाग).

बीस बार चोरकी, तो अेक बार साहकी :—चोराचे चार दिवस, सावकाराचा अेक दिवस. चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे.

बीचमें मेरा चांदभाओ :—आपलेंच घोडें पुढें करणें. लघळपणा करणें. **अपनाही स्वार्थ देखना । अपनी कहानी सुनाना ।**

बीबी नेकबख्त, दमड़ीकी दाल तीन वख्त :—थोड्या खर्चांत काम करणें. चोख नारी, (कोंड्याचा मांडा करणारी) **काटकसरीचा संसार करी.** `कबख्त–हुशार.

बीमारकी रात पहाड़ बराबर :—रोग्याला रात्रीची वेळ कठीण जाते. **रोगीको रातका समय व्यतीत करना कठिन हो जाता है ।**

बुड़ापेमें अक्ल मारी जाती है :—म्हातारपणीं अक्कल चळते. साठी बुद्धि नाठी. शेंडा बुडखा नसणाऱ्या गोष्टी करणें. **बूढे की बातें बेसिर –पैरकी होती है ।**

बुढापेमें मिट्टी ख़राब :—म्हातारपणीं फार कष्ट. वृद्धपणीं हातपाय हालविणें जड जातें. **वृद्धावस्थामें बहुत यातना अें सहनी पडती हैं ।**

बुढ़िया ग़ज़बकी पुडिया :—म्हातारी भांडणाची काळ. संतापी.

बूढ़ढी घोडी लाल लगाम :--म्हातारपणीं डामडौल. **ख़ारिशी कुनिया मखमलकी झूल. बुढापेमें थाटब ट करना ।**

बुढ्ढेकी औलाद :--म्हातारपणचें मूल, अशक्त मूल. **बुढ़ापेमें हुआ संतान निर्बल रहती है ।**

बुढ्ढे तोते राम राम नहीं पढ़ते :--म्हाताऱ्याला दुसऱ्यानें सांगितलेलें पटत नसतें. म्हतारपणीं वायफळ बडबड. तोता-पोपट

बुनिवेमें न वीन बजायवेमें :—निरुपयोगी मनुष्य. न विणण्याचा न तनण्याचा.

बुरा बेटा खोटा पैसा आडे वक्तपर काम आता है :—निरुपयोगी वस्तु कधीं तरी कामीं येतेच, सर्वसंग्रही असावें. **कुपुत्र भी काम आता है।**

बुरा वहीं जो दूसरेको बुरा कहे :—दुसऱ्यास वाईट म्हणणाराच वाईट, दुसऱ्याची निंदा करणारा वाईट. **निंदकही निंद्य होता है।**

बुरे कामके बुरे हवाल :—वाईटाचें फळ वाईट. **बुरे कामका नतीजा बुरा होता है ।**

बुरेका लहसन भी बुरा :—दुर्दैवी मनुष्याला शुभ गोष्टीही हानिकारक.

बुरे वक्तका अल्लाह बेली :—संकटांत वाली परमेश्वर. **समय कठिन होनेपर ईश्वरही त्राता (वाली) होता है ।**

बूँद आघात सहे गिरि कैसे । खलके वचन सन्त सह जैसे :—पर्वतावर पर्जन्याचे थेंब पडतात, तसा सज्जन दुर्जनाचीं कटु वचनें सहन करतात. **दुष्टोंके बचन सज्जन पुरुष शांत चित्तसे सहलेते है ।**

बूँदका चुका घड़े ढुलकावे :— }वेळेवर काम न केल्यानें नुकसान
बूंदसे गयी तो हौजसे नहीं आती }होतें तें कशानें भरून येत नाहीं.
झालेली चूक मागाहून भरून येत नसते. **वक्तपर हुआ थोडी हानि पीछेसे भरपाई करनेसे भी पूरी नहीं होती ।**

बूढ़ा कुत्ता पिलवा नाम :—म्हातारा कुत्रा पिल्ल्या नांव. **गुणके विरुद्ध नाम होना ।** पिलवा-पिल्लू.

बूरके लड्डू खाय तो पछताय, न खाय तो पछताय :—खाल्लें तर बाधतें, न खाल्लें तर शापतें. **दोनों ओरसे दुःख देनेवाली चीज़ ।** बूर-साखर.

बूढ़े को बूढ़ा कहो तो चिढ़ मरे :—दोषी मनुष्याचे दोष दाखवितांच

तो रागावतो. खरें बोललें असतां सख्या आईला राग येतो. सत्य कहनेसे दोषी आदमी चिढ़ता है।

बेअदब बेनसीब, बाअदब बानसीबः—जसें चरित्र तसें भाग्य. जैसी क्रिया वैसा भाग्य होता है। बे–विना. बा–सह. दोन्हीं अुपसर्ग आहेत.

बेल के मारे बबूल तले, बबूलके मारे बेल तले :—आगींतून निघून फुफाटयांत. चुलींतून वेलांत. भाग्यहीन सर्वत्र दुःखी होता है।

बेर लेनको चन्द्रते, निजघर नहीं जलाव :—बलवान् शत्रूचा सूड अुगविण्याकरितां आपली हानि करून घेअूं नये. दूसरेका बदला लेनेके लिअे आत्मनाश नहीं करना।

बेअीमानीका मुँह काला :—विश्वासघातकी जगांतून नाहींसे होवोत. देशद्रोही नाश पावोत. शापनिदर्शक वाक्य.

बेअैब जात खुदाकी :—अेकटा परमेश्वर निष्कलंक आहे.

बेगुठलीका मेवा :—बिन बियांचा मेवा. अत्यंत मृदु वस्तु.

बेकारी बिकारी :—रिकामें बसून कंटाळवाणें वाटतें. बेकार रहनेसे चित्त व्यग्र होता है।

बेकारीसे बेगारी भला :—बेकार मनुष्यापेक्षां मजूर बरा.

बेख़ार गुल नहीं :—दुःखांतीं सुख. दुःखाशिवाय सुखाची किंमत नाहीं. गुलाबाला कांटे. दुःखके कारण सुख मालुम होता है।

बेटेसे नाम चलता है :—वंशवृद्धिकरो पुत्रः।

बोये गेंहू, अुपजा जौ :—
बोये आम फले भाटा :— चांगल्याचें वाअीट फळ मिळणें. अच्छे कामका फल बुरा फल प्राप्त होना।

बेटा बनकर सबने खाया है, बाप बनकर किसीने नहीं खायाः— मुंगी होअून साखर खावी. लहानपण श्रेयस्कर. ज्यानें सोडिली अहंता त्यानें कोंडिलें अनंता. नम्रतासे लोकप्रियता मिलती है।

बेटी और ककड़ी की बेल बराबर :—दोडक्याच्या वेलीला व मुलीच्या जातीला वाढ फार.

बे थॉंग चोरी नहीं होती :-घरभेद्यामुळं चोरी होते. जहाँ भेद वहाँ चोरी।

बेदर्द कसाअी क्या जाने पीर पराअी :—परदुःख शीतळ असतें. कसायाची सुरी चराचर चिरी. निर्दयीको दर्द नहीं होती।

बेमेह की ढामरी, घोडा बिन लगाम, बे माथेके लश्कर, तीनों भओ निकाम :—पावसाळयावांचून शेती, बिन लगामाचा घोडा व सेनापतीवांचून सेना व्यर्थ होय।

बेल पका तो कौवे के बापको क्या? निरर्थक वस्तूशीं प्रयोजन काय? विधवेला कुंकवाची अुठाठेव कशाला. गाढवाला गुळाची चव काय?

बेल फूटा, राओ राओ होगया :—आपसांतील दुही बुडवी डोहीं. अेकता नष्ट होनेके बाद बर्बादी होती है।

बैठेसे बेगार भली :—बसण्यापेक्षां मजुरी बरी. बेकार बैठनेसे मुफ्तका-काम करनाही ठीक है। बेगार–बिगारीपणा.

बैठे देवल सिखरपर, वायस गरुड न होय :—राजवाड्यावर बसलेला कावळा गरुड होत नाहीं. वैभवपूर्ण नीच श्रेष्ठ होत नाहीं. प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते।

बैदकी बैदाओ चंगा करे खुदाओ :—वैद्याचें औषध देवाचा हवाला. औषधं जान्हवीतोयं, वैद्यो नारायणो हरिः।

बैरी तजै न हा हा खाय :—गयावया करूनही शत्रु सोडीत नाहीं. ओळखीचा चोर जिवें मारी. खुशामद करनेपरभी शत्रु दया नहीं करता।

बैरी से बच, प्यारे से रच :—शत्रुपासून दूर रहा, मित्राशीं प्रेम कर. बैरीसे दूर और मित्रोंके साथ रहना अच्छा है।

बैरीका बोल, बसूलेका लोल :—शत्रूचे बोल शल्याप्रमाणें मनांतच बोचतात. दुश्मनकी दुष्ट बातें दिलमें चुभती हैं। बसूला–हत्यार-वाकस.

बोटी देकर बकरा लेते हैं :—आवळा देऊन कोहळा काढणें. कोंडा देऊन पोहे मागणें. कीमतसे ज़्यादा लाभ अुठाना। बोटी–मांसाचा तुकडा.

बोटी नहीं, तो शोरुआ सही :—नसण्यापेक्षां असणें बरें. दगडापेक्षां वीट मअू. शोरुआ–शोरबा–रसा.

बोया न जोता मुफ़्तका पोता :—नशिबवान असणें. अनपेक्षित (मुफ्तका) लाभ होना। मुफ़्तका–फुकटचा. बिनाकष्ट प्राप्ति.

बैलका बैल गया, नौ हाथका पगा गया :—बैलचा बैल गेला, नअू हात लांब दोर गेला. बाबा गेला नि दशम्या गेल्या. संपूर्ण हानि होना। पगा–अुपरणें, अंगवस्त्र.

ब्याजके आगे घोड़ा नहीं दौड़ सकता :—व्याजाची दौड घोड्यापुढें. व्याजाची अुडी सागर तोडी. **ब्याज मुद्दलसे भी ज्यादा बढ़ता है।**

ब्याही बेटी पड़ोसिन दाख़िल :—विवाहानंतर मुलगी परक्याची. **विवाहके बाद बेटी दूसरोंकी हो जाती है।**

ब्याही मरी कुवाँरी भाग :—अेकाची हानि दुसऱ्याचा लाभ. लग्नाची मेली कुमारिकेला जागा झाली. **अेक मरी दूसरीको पति मिला।**

(भ)

भअील ब्याह मोर करबो का :—काम झालें नातें तुटलें. गरज सरो वैद्य मरो. **कार्य होनेपर बेपर्वाहीकी बातें करना।**

भअी गति कीट भृंगकी नाअीं :—आपलें रूप सोडून दुसऱ्यांत मिसळणें. अळी व भुंगा या दृष्टांताप्रमाणें रूपांतर होणें. **अपना देह छोड़कर परकायारूप हो जाना।**

भअी गति साँप छछूंदर केरी :—बुचकळ्यांत पडणें. द्विविधा चित्त होणें. **असमंजसमें पड़ जाना।** केरी–सारखी.

भगवतको भगवत ही जाने :—ज्ञानी मनुष्यास ज्ञानी ओळखतो. गुणी गुणं वेत्ति। **साधुही साधुको पहचानता है।**

भगवान देता है छप्पर फाडकर :—प्रसन्न होता कमलाकरानें, देतां किती घेशील दो करांनीं. देव देअू लागल्यावर भरपूर देतो. **परमात्मा देता है तब बिना कष्टके धन मिल जाता है।**

भट पड़े वह सोना, जिससे टूटे कान :—ज्यानें नुकसान होतें ती गोष्ट वाअीट. सोन्याची सुरी झाली म्हणून ती अुरांत मारीत नाहीं. (आग लगे वह० पहा.)

भटा अेकको पित करे, करे अेकको बाय :—अेकाच वस्तूचे भिन्न परिणाम. **अेकही खाद्यवस्तु भिन्न व्यक्तियोंपर वात और पित्त आदि पृथक पृथक परिणाम करती है।** भटा–वांगीं. बाय–वात, वारा.

भड़क भारी जेब खाली :—सफेत कपडे खिसे खालीं. **बाहरी शान दिखलाना। देखनेमें ढ़बू, जैसी हालत होना।**

भड़भड़िया अच्छा, पेट पापी बुरा :—कपटीपेक्षां स्पष्टवक्ता बरा. कपटी आदमीसे साफ साफ कहनेवाला अच्छा।

भडभूंजेकी लडकी केसरका टीका :—भडभुंजाची मुलगी केशराचा टिळा. तुच्छ काम करनेवालोंका नखरे करना। जाटकी बेटी सुंदर नाम।

भर दे भर पावे, काल कंटक पास न आवे :—अधिक पुण्य अधिक फलप्राप्ति, कालसर्प यांची बाधा न होवो असा दात्यास आशीर्वाद.

भरपेट खाना, नींद्‌भर सोना :—आठा भोज्या मठा निद्रा. यह आलसी व्यक्ति की अुक्ति है।

भरमा भूत और शंका डायन :—भूत पिशाच्चें भ्रमाचीं होत.

भरी मुट्ठी सवा लाखकी :—झांकली मूठ, सवा लाखाची. अन्दरकी बात प्रकट न होने अमुल्य होती है।

भरे को भरता है :—भरण्यावर भरतें. नको तेथें भरती. धन में धन मिलता है।

भरे पेट पर शक्कर खारी :—पोट भरल्यावर जिभेची चव जाते. भरल्यापोटीं चेष्टा भारी. पेट भर जानेपर शक्कर भी खारी लगती है।

भरे समुंदर घोंवा प्यासा :—सुखसागरांत दुःखी जीवन. पास में लक्ष्मी होते हुअे भी दुःखमय जीवन होना।

भरे समुंदर घोघा (घोंघा) हाथ :—भरल्या समुद्रांतून कोरडा येणें. अधिक लाभ की जगहसे थोड़ासा लाभ होना। घोंघा–शंख.

भरोसे की भैंस पड़ा बियानी :—भरंवशाच्या म्हशीला टोणगा. जैसा मनमें सोचते है वैसा नहीं होता।

भला किया सो खुदाने बुरा किया सो गन्देने :—देव सर्व बऱ्या गोष्टी करतो. वाअीट गोष्टी मानव करतो. अच्छे कर्म अीश्वर के, बुरे का कर्ता आदमी। गन्दा–मलीन

भलाअी को बुराअीसे डर :—भल्याला वाअीटापासून भीति. सत्याला असत्याची लाज. सज्जनको दुष्कर्मका भय (पापका डर) होता है।

भरा कहार और खाली कुम्हार तेज जाते हैं :—डोक्यावर ओझें घेतलेला कहार व रिकामा कुंभार अैटीनें चालतो.

भला मानस घरमें पडा रिजालेने जाना मुझसे डरा :—भला भ्याला भलाओीला दुर्जन म्हणे मला भ्याला. चोराला चोरच भासतात. **मनुष्य जैसा होता है वैसाहि सोचतां है।**

भले आदमीकी मुर्गी टके टके :—सज्जन विनयानें मारला जातो. भीड भीकेची बहीण. **मनुष्य मुलाहिजेमें मारा जाता है।**

भलेका जमाना नहीं है :—दुनिया भल्याची नाहीं. **भले करना और अुलटा फल मिलना अैसा ज़माना होना।**

भलेके भाओी बुरेके जमाओी :—सज्जनांशीं नमून व दुर्जनांशीं सडेतोड वागावें. मअू मेणाहून नि कठीण वज्राहून. **भलेके साथ अच्छा बर्ताव करना और बुरेके साथ बुरा बर्ताव करना।**

भले घोड़ेको अेक चाबुक भले आदमीको अेक बात :—मुर्खास मार आणि शहाण्यास बोल. **समझदार अिशारेसे बात जान लेता है।**

भले बुरेका साथ क्या :—सज्जन दुर्जनांची संगति कशी व्हावी. **भले बुरेका जम नहीं बैठता। भले बुरेकी सोहबत अशाश्वत होती है।**

भले भलेके कोओी साथी :—भल्याचे सर्वच मित्र असतात. **भले अदमीके सब मित्र होते है।**

भलो भयो मेरी मटकी फूटी मैं दही बेचनेसे छूटी :—मडकें फुटलें काम सुटलें. पाटी फुटली शाळा सुटली, अशा अर्थी. **काम करने की वस्तु या चीज बिगडनेसे छुटी मिलने का आनंद पाना।**

भवन बनावत दिन लगे ढ़ावन लगत न बार :—कोणतेंही काम करण्यास वेळ लागतो, बोलण्यास लागत नाहीं. **बड़ा काम बनते देर लगती है। बिगड़ते देर नही लगती। भवन**—घर. **ढाना**—पाडणें. **बार**—विलंब.

भाओी न दे भाव दे :—व्यवहार चोख असावा. **बाजार भावसे बेचनेमें भीड नहीं रखना।**

भाओी सो भाओी बाकी छींके पर लटकाअि :—भाअू तो भाअू अितर सर्व बाअू. **आफतमें भाओी ही काम आता है। बंधुप्रेम निस्सीम होता है।**

भाखा जो न जाने ताही शाखा मृग जानिअे :—मातृभाषेच्या विरोधकास व्यंगोक्ति. **मातृभाषा आवश्य पढना। शाखामृग**—माकड, वानर.

भागे जाहि नाम रजपुत :—नांव मराठा रणांत पळपुटा. नांव रजपूत रणाकडे पाठ. **गुणके विरुद्ध नाम।**

भागते भूतकी लगोटीही सही :—पळत्या भुताची शेंडी. (लंगोटी) चोरीस गेलेल्या धनापैकीं हातीं लागेल तेंच खरें. **सर्वनाश हो तो अुसमेंसे जो बचा रहे वही बहुत है। जहाँ कुछ प्राप्त होनेकी आशा न हो वहाँसे जो कुछ हात आअेगा वही अच्छा है।**

भागे भूतकी मुँछेँ भली :—पळत्या चोराची लंगोटी बरी. अर्थात् हातीं येअील तें. पुराव्याकरितां कामीं येतें. **मुँछेँ**–मिशाचे केंस.

भागे हुअे लश्करका मर्द पीछा नहीं करता :—पाठ दाखविलेल्या शत्रूचा शूर पाठलाग करीत नाहीं. शूर शरणागतास जीवदान देतात.

भाग्यवानके खेतको, जोत जात है भूत :—भाग्यवंताचें काम स्वयं होतें. भाग्यवंताचे घरीं स्वतः देव काम करी. **भाग्यशील आदमीका काम करनेको तकलीफ नहीं पडती।**

भाडा ब्याज दक्षना, पीछे पडे कुछ ना :—भाडें, व्याज, दक्षणा तावडतोब वसूल करावी. **भाडा दच्छना आदि फौरन लेनी चाहिये। अिन तीनोंको अवसर पर नहीं छोडना चाहिअे। बादमें कष्टसे भी नहीं मिलते।**

भात खाकर जातकी पूछना :—भाकर खाअून जात विचारणें. **जाँच पहले कर लेनी चाहिये।**

भात छोडा जाता है, साथ नहीं छोडा जाता :—दाट मैत्री सोडवत नाहीं. **सोहबतका असर होता है।** साथ–संगत, पति, सहचर.

भात होगा, तो कौअे बहुत आ रहेंगे :—शितें तंवर तीं भुतें भोंवतीं. घुगऱ्या तिथें अुदोअुदो. गूळ आहे तेथें गुळाला मुंगळे असायचेच. **धनीके पास खानेवाले अिकट्ठे होते जाअेंगे।**

भानु अुदय दीपक कह काम? :—गुणी मनुष्यापुढें मूर्खाची काय प्रभा.? **बलवान और गुणीके आगे कमज़ोरकी कद्र नहीं होती।**

भानु कृशानु सर्व रस खाँहीं, तिन कहँ मन्द कहत कोअि नही :— समर्थाला कोणी दोष देत नाहीं. **थोर व्यक्तिको दोष लगा नहीं जाता।**

भा विधिना प्रतिकूल जबै, तब अूंट चढ़े पै कूकर काटे :—दैव

प्रतिकूल होतांच अघटित घडून येतें. **समय पडेकी बात, बाजपर झपटे बगुला । प्रतिकूल दैव होनेसे अघटित घटना हो जाती है । कूकर–कुत्रें.**

भारी पत्थर देखा, चूमकर छोड़ दिया :—शक्तिबाहेरचें काम अजमावून टाकून द्यावें. **सामर्थ्यसे बाहर काम हो, तो छोड देनाही अच्छा ।** चूमकर–अजमावून.

भारी ब्याज मूलको खाय :—भरमसाट व्याजानें कर्जदार बुडतो व सावकाराचें कुळ नष्ट होतें. **भारी ब्याजसे कर्जदार खतम हो जाता है ।**

भावजकी थैली, सराफ़ी करे देवरा :—विश्वस्त अशा परक्यांच्या धनापासून फायदा घेणें. आयजीच्या जिवावर बायजी उदार **भावज**–भावजय. **देवर**–दीर.

भाव रावकी खबर नहीं
भाव राव खुदाके हाथ :— } बाजारभाव व राजाचे डाव कोणासही कळत नाहींत. राजेलोकांचा पाताळयंत्रीपणा अगम्य असतो.

भावी बड़ी प्रबल :—होणारी गोष्ट चुकणार नाहीं. **भविष्यकालकी बातें अवश्यही होंगी । होनहार कभी टलती नहीं ।**

भीखकी हँडिया सिकहर पर नहीं चढती :—भिक्षेकरी लक्षेश्वर होत नाहीं. भिकेची हंडी शिक्यावर (खुंटीला) चढत नाहीं. **भीख माँगनेवाला कभी मालदार नहीं होता ।**

भीकके टुकडे बाजारमें ड़कार :—भीक मागणें नि अट करणें. भिकाऱ्याच्या डरकावण्या. **व्यर्थ मिज़ास करना ।**

भीख मांगे आंख दिखावे :—भिकारी नि राग करी. **ओछा आदमीका रोब दिखाना । दूसरों के सहारे कार्य करके क्रोध दिखाना या घमंड करना ।**

भीगा चूहा :—चरित्रहीन मनुष्य. **भीगा**–भिजलेला.

भीगी बिल्ली :—कांहीं कारणानें मिंधी झालेली व्यक्ति. **किसी कारणसे दबा हुवा सयाना । भीगी**–छी:थू: झालेली.

भीत टले पर बान न टले :—वाईट संवय सुटत नसते. **बुरी आदत (बान) कभी नहीं छूटती ।**

भीतरके पट तब खुलैं बाहरके जब दे :—ज्ञानप्राप्ति होतांच अंतर-शुद्धि होते. **वस्तुस्थितीका ज्ञान होनेसे अंतःपट खुल जाते हैं ।**

भीत रहेगी तो लेव बहुतेरे चढ़ रहेंगे :—सिर सलामत तो पगडी पचास. **पुंजी होगी तो ब्याज बढेगा । 'अंडे होंगे' तों** पहा.

भीष्म प्रतिज्ञा :—घोर प्रतिज्ञा–कठोर शपथ.

भुसके मोल मलीदा :—बिन मोल (स्वस्त) माल. **भुसकें मोल चुरमा । टके सेर चीज मिलना । मलीदा**–चुरमा.

भुसमें आग लगाकर (भुसमें चिनगी डाल) जमालो दूर खडी :—भांडण लावून मजा पाहणें. देवळांत देवी गांवांत नायटे. **लड़ाओी लड़ाकर दूर होना और मज़ा देखना ।**

भुखा बंगाली भात–भात पुकारे :—भुकेला बंगाली भात–भात असें ओरडतो. **खानेवाला अपने प्रिय पदार्थ कोही पुकारता है ।**

भूख में सूखी रोटी ही पापड :—भूकेच्या तोंडीं वाओीट पदार्थही गोड. भुकेला कोंडा निजेला धोंडा.

भूखा मरता क्या न करता :—क्षुधित सर्व कांहीं करूं शकतो. बुभुक्षितः किं न करोति पापम् । **भूखा आदमी हर प्रयत्नसे खानेकी चीज पैदा करेगा ।**

भूखा सो रूखा :—भुकेला सदैव रागेला. **भूखा आदमी क्रोध दिखाता है ।**

भूखमें किवाड़ पापड़
भूखमें गूलर पकवान } भूकेच्या तोंडीं वाओीट पदार्थ देखील गोड लागतो. **भूखा आदमी बुरी चीज भी स्वादसे खाता है ।**
किवाड़–लांकडाची फळी. **गूलर**–अुंबर.

भूख लगी तो घरकी झूझी :—भूक लागली घर सुचलें. **भूख लगनेपर घरकी याद आती हैं । सूझना**–आठवण होणें.

भूखे बेर अघाने गाँडा :—जेवणापूर्वी बोरें व जेवणानंतर अूस खाणें चांगलें. **भूखे पेट बेर और भोजनोत्तर गन्ना खाना अच्छा । गाँडा**–अुसाची गंडेरी. **अघाने**–पोटभरल्यावर, जेवणानंतर.

भूख न जाने बासी भात, प्यास न जाने धोबी घाट :—भूक व तहान यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. भुकेला कोंडा निजेला धोंडा, क्षुधेनें मरत असतां स्पृश्यास्पृश्य पाहूं नये.

भूखे भजन न होय गोपाल :—आधीं पोटोबा मग विठोबा. **भूखा आदमी से चित्त स्थिर न होनेके कारण भगवद् भजन नहीं होता।**

भूतका पक्वान } तत्काळ नष्ट होणारें द्रव्य.
भूतकी मिठाओ } जादूगारानें निर्माण केलेलें.

भूतको पत्थरकी चोट नहीं लगती :—भूताला दगडाची जखम होत नाहीं. कारण तें गुप्त होतें. **पत्थर को देखकर भूत भाग जाता है या अदृश्य हो जाता है।** छोट—घाव.

भूत जान न मारे हैरान करे :—दुष्ट मनुष्य छळ फार करतो. **दुष्ट आदमी छलदायक होता है। जान के बदले हैरान करता है ।**
अ० अस्वल मनुष्याला मारीत नाहीं, गुदगुल्या करून हैराण करतें.

भूतनके घर बेटा-बेटी:- } ज्या घरांत पिशाच्चांची वस्ती तेथें मुलेंबाळें
भूतन घर संतति कैसी } नसतात. **जिस घरमें भूतका वास होता है वहा सन्तान नहीं होते ।**

भूनी भांग न कड़ुआ तेल :—कफल्लक होणें. **पास कुछ भी न होना ।**

भूमि नाग सिर धरइ की धरनी :—क्षुद्र मनुष्य मोठें कार्य करूं शकत नाहीं. शेषच पृथ्वी मस्तकावर धरूं शकतो, इतरांची प्राज्ञा नाहीं.

भूमि पार कर गहत अकासा :—पृथ्वी पादाक्रांत करून आकाशाला गवसणी घालूं पाहणें. **जबरदस्त महत्वाकांक्षा करना या अनहोनी बात करनेकी आकांक्षा करना।** पराकर—जिंकून. गहत—घेऊं पाहणें.

